रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २८०
www.ramprahar.com
◆ बुधवार, २९ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

अतिउष्णतेमुळे तरुण फुटपाथवर कोसळला/३
माणगावमध्ये अनेक कार्यकर्त्यांचा भाजपत प्रवेश/७
नवी मुंबई रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप उत्साहात/८

## विधान परिषदेसाठी भाजपकडून सहा उमेदवारांची घोषणा

**मुंबई :** विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आली आहे. भाजपने सहा उमेदवारांची नावं जाहीर केली आहेत. विधान परिषद निवडणुकीच्या १० जागांसाठी येत्या १२ मे रोजी निवडणूक होणार आहे. भाजपच्या वाट्याला १० पैकी ६ जागा आहेत. विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी प्रज्ञा सातव यांचे नाव भाजपकडून जवळपास निश्चित झाले होते. तर इतर पाच जणांच्या नावांवर आज शिक्कामोर्तब करण्यात आला. भाजपकडून सर्व उमेदवारांची नावं जाहीर करण्यात आली आहेत. यामध्ये सुनील विनायक कर्जतकर, माधवी नाईक, संजय नत्थूजी भेंडे, विवेक बिपिनदादा कोल्हे, प्रमोद शांताराम जठार आणि प्रज्ञा सातव यांना संधी देण्यात आली आहे. भाजपकडून पाच जणांची नाव फायनल करताना जातीय आणि प्रादेशिक समतोलाचा देखील विचार करण्यात आला असल्याची माहिती सुत्रांनी दिली.

# छत्रपती शिवरायांच्या नावाचा वाद संतापजनक

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्ट प्रतिक्रिया

**सोलापूर : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांचा अवमान या देशात कोणीही करू शकत नाही, त्यांचा मान अढळ आहे. मात्र, सध्या महाराजांच्या नावावर जे निरर्थक वाद सुरू आहेत, ते चर्चेत राहण्यासाठी केलेले प्रकार असून ते अत्यंत असंवेदनशील आहेत," अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. कॉम्रेड गोविंद पानसरे लिखित 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी मंगळवारी सोलापूर येथे



माध्यमांशी संवाद साधताना ही भूमिका मांडली.

बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकातील उल्लेखावरून प्रकाशक प्रशांत आंबी यांना दिलेल्या धमकीमुळे वादाला तोंड फुटले आहे. यावर मुख्यमंत्री म्हणाले की, "हे पुस्तक १९७९ साली लिहिण्यात आले. त्यावर आज इतक्या वर्षांनी वाद उकरून काढणे आणि दोन्ही बाजूंनी एकमेकांना भिडणे हे सामाजिक स्वास्थ्य बिघडवणारे कृत्य आहे. आक्षेप घेणाऱ्यांनी (संजय गायकवाड) हे पुस्तक वाचले आहे की नाही, हे मला माहिती नाही आणि आंदोलन करणाऱ्यांनाही आपण नेमके कशासाठी रस्त्यावर उतरलो आहोत, हे ठाऊक आहे की नाही, यात शंका आहे." केवळ प्रसिद्धीसाठी ऐतिहासिक संदर्भांचा विपर्यास करून वाद निर्माण करणे अयोग्य असल्याचेही त्यांनी नमूद केले.

### मुंबईतील हल्ल्यामागे 'स्व-कट्टरतावाद'

मुंबईत धर्म विचारून करण्यात आलेल्या चाकू हल्ल्याच्या घटनेवरही मुख्यमंत्र्यांनी भाष्य केले. हे प्रकरण 'सेल्फ रॅडिकलायझेशन' (स्व-कट्टरतावाद) स्वरूपाचे असल्याचे सांगितले. इंटरनेट आणि विशिष्ट साहित्याच्या माध्यमातून कट्टरतावादाचे विष पेरले जात आहे. त्यातूनच हा आरोपी तयार झाला असून, केवळ इतर धर्मीयांना लक्ष्य करण्याच्या जिहादी विचाराने तो प्रेरित झाला होता," असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

# अरविंद म्हात्रेंकडून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न

### ॲड. प्रकाश बिनेदार, बबन मुकादम यांच्याकडून सिग्नलच्या कामासंदर्भातील आरोपाला प्रतिउत्तर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेत मंगळवारी (दि.२८) आयोजित पत्रकार परिषदेत स्थायी समिती सभापती बबन मुकादम आणि सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे यांनी केलेल्या आरोपांवर जोरदार प्रतिउत्तर दिले. सिग्नलच्या कामासाठी २०० कोटी रुपयांचा ठेका दिल्याचा आरोप पूर्णतः खोटा, निराधार आणि जनतेची दिशाभूल करणारा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सभागृह नेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी सांगितले की, "महापालिकेने असे कोणतेही काम काढलेले नसताना चुकीची माहिती पसरवून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जर अरविंद म्हात्रे यांच्याकडे २०० कोटींच्या कामाचा पुरावा असेल, तर त्यांनी तो जनतेसमोर सादर करावा," असे खुले आव्हानही बिनेदार यांनी म्हात्रेंना दिले आहे.

यावेळी स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांनीही **(पान २ वर..)**

## रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी शिकण्यासाठी मुदतवाढ

**मुंबई :** मराठी भाषा सक्तीबाबत १ मे ते १५ ऑगस्टदरम्यान विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याची घोषणा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केलीय. या कालावधीत केवळ मराठी भाषा न येण्याच्या कारणावरून कोणाचाही परवाना रद्द केला जाणार नाही. चालकांना मराठी भाषा शिकण्यासाठी मुदतवाढ आणि पुरेसा वेळ दिला जाणार आहे. त्याच वेळी परवाना पडताळणी मोहीम १ मेपासून सुरू होणार असून, मोटार वाहन कायद्यातील नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांचे परवाने रद्द केले जातील, असेही सरनाईक यांनी स्पष्ट केलंय.

वाहतूक संघटना आणि राजकीय नेत्यांसोबत बैठक घेतल्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी ५९ आरटीओ अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीत चर्चा झाल्यानंतर मुदतवाढ देण्याचा निर्णय जाहीर करण्यात आलाय. १५ ऑगस्टपर्यंत विविध संघटनांकडून आपापल्या भागात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी शिकवले जाणार आहे. मराठी भाषा ही रिक्षा-टॅक्सी चालकांना अनिवार्य असणारच आहे. त्यामुळे आम्ही फक्त मुदतवाढ देत आहोत पण मुजोरी खपवून घेतली जाणार नाही, असे सरनाईक यांनी निर्णय जाहीर करताना सांगितलं.

## लग्नाला जाताना कुटुंबावर काळाचा घाला

**अमरावती : प्रतिनिधी**

अमरावती जिल्हातील वरूड-मोर्शी महामार्गावर रस्ते अपघाताची भीषण घटना समोर आली आहे. खडका फाट्याजवळ झालेल्या भीषण रस्ते अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे.

लग्न समारंभासाठी निघालेल्या या कुटुंबावर काळाने घाला घातला. आनंदाचा क्षण असताना कुटुंबावर अशाप्रकारे दुःखांचा डोंगर कोसळला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नागपूर येथून एका लग्न समारंभासाठी नांदे कुटुंब निघाले होते. वरूड ते मोर्शी महामार्गावरून प्रवास करत

**तिघांचा जागीच मृत्यू**



असताना खडका फाट्याजवळ त्यांच्या चालकाचे वाहनावरील नियंत्रण अचानक सुटले आणि यानंतर ते भरधाव वाहन रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडावर जाऊन जोरात धडकले. ही धडक इतकी जोरात होती की वाहनाचा दर्शनी भागाचा चक्काचूर झालाय.

या दुर्दैवी अपघातात नांदे कुटुंबातील तीन सदस्यांचा मृत्यू झाला आहे. किरण नांदे, समाधान नांदे, आणि दिया नांदे (३ वर्ष) अशी या तिघांची नावे आहेत. या अपघातात गोपाल नांदे हे गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सुदैवाने या भीषण धडकेतून ते बचावले असले तरी त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे. (Amravati accident) या अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य राबवले. एका तीन वर्षीय चिमुकलीसह तिघांचा मृत्यू झाल्याने उपस्थित सर्वांचेच डोळे पाणावले होते.

## गुजरातमध्ये भाजपचाच डंका

**सुरत :** भारतीय जनता पक्षाने २०२६ च्या गुजरात महानगरपालिका निवडणुकीत पुन्हा एकदा निर्विवाद वर्चस्व सिद्ध केले आहे. राज्यातील सर्व १५ महानगरपालिका जागांचे निकाल जाहीर झाले असून, भाजपने सर्व जागा जिंकून मोठे यश संपादन केले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत काँग्रेस आणि केजरीवालांच्या आपचा सुपडा साफ झाला आहे. तर, या विजयामुळे भाजपाने गुजरातमध्ये त्यांनी संघटनात्मक बांधणी आणि ताकद अजूनही मजबूत असल्याचे दाखवून दिले आहे.

## नदीत बुडून तीन जणांचा मृत्यू

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

चंद्रपूर जिल्ह्यातील धानोरा गावाजवळ वर्धा नदीत घडलेल्या हृदयद्रावक घटनेत वडिलांना वाचवण्याच्या प्रयत्नात दोन अल्पवयीन मुलींनीही आपला जीव गमावला. या दुर्दैवी प्रकारामुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

मृतांमध्ये राजू कोडापे (वय ४०), त्यांची मुलगी अर्पिता कोडापे (वय १२) आणि भाची प्रियांका मडावी (वय १४) यांचा समावेश आहे. मिळालेल्या माहितीनुसार, चंद्रपूर तालुक्यातील धानोरा गावालगतच्या वर्धा नदीवर कपडे धुण्यासाठी गेले होते. यावेळी अचानक पाण्याचा अंदाज न आल्याने राजू कोडापे हे खोल पाण्यात जाऊन बुडू लागले. वडील बुडत असल्याचे पाहून मुलगी अर्पिता त्यांना वाचवण्यासाठी नदीत धावली, मात्र तिलाही पाण्याचा अंदाज न आल्याने तीही बुडू लागली. यानंतर भाची प्रियांका मडावी हिने वाचविण्यासाठी नदीत उडी घेतली. परंतु दुर्दैवाने तिलाही बाहेर पडता आले नाही आणि तिघेही पाण्यात बुडाले. हा सारा प्रकार अत्यंत वेदनादायक असून मदतीसाठी कोणीही वेळेत पोहोचू न शकल्याने तिघांचाही मृत्यू झाला.

या घटनेची नोंद घुग्घुस पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.

## निवडक

### चीनमध्ये पावसाचा हाहाकार! पूर नियंत्रण आणीबाणी घोषित

**बीजिंग :** चीनच्या दक्षिण भागात महाप्रलय आला आहे. सततच्या पावसामुळे किनझोऊ शहरात पूरस्थिती निर्माण झाली आहे. रविवारपासून सतत पाऊस पडत असून अनेक रस्ते पाण्याखाली गेली आहे. दुकाने, शोरुम्स आणि घरांमध्ये पाणी शिरले आहे. सध्या स्थानिक प्रशासनांनी पूर नियंत्रण आणीबाणी घोषित केली आहे. तीन दिवसांपासून दक्षिण चीनमधील दैनंदिनन जीवन विस्कळीत झाले आहे.

### लातूर जिल्ह्यात उष्माघाताचा चौथा बळी; वृद्ध शेतकऱ्याचा मृत्यू

**लातूर :** जिल्ह्यातही मे महिन्याच्या सुरुवातीआधीच उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत असून मंगळवारी आणखी एक दुर्दैवी घटना समोर आली आहे. निलंगा तालुक्यातील पानचिंचोली येथे ७५ वर्षीय शेतकऱ्याचा मृत्यू झाला असून उष्माघाताने त्यांचा मृत्यू झाल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त केला आहे. त्यामुळे जिल्ह्यात उष्माघातामुळे मृतांचा आकडा आता चारवर पोहचला आहे. तर राज्यात आतापर्यंत उष्माघाताचे सुमारे १०हून अधिक बळी गेले आहेत.

## रायगडातील अंगणवाड्यांमध्ये बालकांना आता इंग्रजीचे धडे




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात अंगणवाड्यांमध्ये बालकांना आता इंग्रजीचे धडे मिळणार आहे. मराठी भाषेबरोबरच आता इंग्रजी भाषेची तोंड ओळख बालकांना व्हावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. महिला व बाल विकास आणि शिक्षण विभागाच्या संयुक्त प्रयत्नातून हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविला जाणार आहे.

रायगड जिल्ह्यात महिला व बाल विकास विभागाच्या अंतर्गत ३ हजार १६१ अंगणवाड्या आहेत. या अंगणवाड्यामध्ये दाखल होणाऱ्या बालकांना पोषण आहारा सोबत आता मराठी आणि इंगजी भाषांचे धडे दिले जाणार आहेत. रायगड जिल्हा परिषदेनी यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. महिला व बाल विकास विभाग आणि शिक्षण विभागाच्या माध्यमातून हा उपक्रम राबविला जाणार आहेत. यासाठी निवृत्त शिक्षकांच्या सहकार्याने इंग्रजी भाषेचा अभ्यासक्रम तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

अंगणवाडी सेविका आणि मदतनीसांच्या माध्यमातून बालकांना मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांची तोंड ओळख करून दिली जाणार आहे. पालकांचा इंग्रजी शाळाकडे असलेला ओढा वाढत आहे. मराठी शाळांमधील पटसंख्या घटते आहे. अशावेळी शाळाप्रमाणे अंगणवाड्यांचाही पट कमी होऊ नये यासाठी हा उपक्रम राबविला जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील यांनी दिली.

> जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये इंग्रजी भाषेची तोंड ओळख बालकांना व्हावी यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत. आगामी शैक्षणिक वर्षापासून सर्व अंगणवाड्यांमध्ये इंग्रजी भाषेचे धडे दिले जातील.
>
> **-मधुकर पाटील,**
> उपाध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद



### पंतप्रधान रमले फुटबॉलमध्ये...

**गंगटोक : पश्चिम बंगालमधील निवडणूक प्रचार संपल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी सिक्कीममध्ये दाखल झाले. दोन दिवसांच्या दौऱ्यावर आलेले पंतप्रधान मोदी मंगळवारी सकाळी गंगटोकच्या तरुणाईमध्ये फुटबॉलचा आनंद घेताना दिसले. फुटबॉलच्या मैदानातील हे फोटो पंतप्रधान मोदींनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर शेअर केले.**

## हस्तलिखित दस्तऐवज डिजिटल नोंदणीसाठी हर घर दस्तक मोहीम

**मुंबई : प्रतिनिधी**

हस्तलिखित दस्तऐवजांचे सादरीकरण ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा जतन उद्देशाने केंद्र डिजिटल नोंदणीचा उपक्रम सुरू केला आहे. 'हर घर दस्तक' ही विशेष मोहीम हॉटेल नोंदणीसाठी येत आहे. या मोहिम सहभागी महाराष्ट्राच्या हस्तलिखित दस्तऐवजांच्या सांस्कृतिक नोंदीतून सांस्कृतिक वारसा जगा वेळ आणावा, असे निर्देश सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी दिले.

पु. ल. देशपांडे आत्मविश्वास कलात अकादमीच्या ॲक्काद मंत्री आयोजित. शेलार बोलत होते. बैठकीस सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव किरण कुलकर्णी, संचालक विभीषण चवरे, उपसचिव सामंत आदि उपस्थित होते. तर दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे विभागीय विभाजक, मंत्री ॲड.आशिष शेर, केंद्र सरकारचे मार्गदर्शक तत्त्वांनुसार, स्थानिकांचे हस्तलिखित दस्तऐवज जतन आणि डिजिटलायझेशन हे मुख्य उद्दिष्ट आहे. यासाठी ' ज्ञानभारती ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या ॲपच्या उच्च भारताचा प्राचीन आणि समृद्ध सांस्कृतिक वारसा स्तरावर मदत होणार आहे.

लोकमत १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून सर्व ग्रामपंचायतींच्या अधिकारनियोजनाचा विषय मांडण्याचे निर्देश दिलेले मंत्री ॲड शेला गावपातळीवरील हस्तलिखित स्वरूपातील स्थानिक वारसा जतन उपक्रम हा अत्यंत महत्त्वाचा ठरणार असल्याचे सांगितले.

### शिडाच्या होड्यांची शर्यत

(छाया : सुधीर नाझरे)



**मुरूड : वर्षभर लाखो पर्यटकांची सुरक्षित जंजिरा किल्ल्यात शिडाच्या बोटीतून ने-आण होते. या होडीमालकांच्या कामाचा गुणगौरव करण्यासाठी किल्ल्यासमोर बोटींच्या स्पर्धा रंगल्या.** (वृत्त पान ७ वर..)

# रायगडात जनगणनेसाठी पाच हजार प्रगणक सज्ज

**अलिबाग : प्रतिनिधी**

देशाच्या विकास आराखड्याचा कणा मानली जाणारी जनगणना आता पूर्णपणे डिजिटल होण्याच्या उंबरठ्यावर आहे. भारत सरकारच्या निर्देशानुसार होणारी जनगणना ही पारंपरिक पद्धतींपासून पुढे जात तंत्रज्ञानाधारित होणार असून, रायगड जिल्हा प्रशासनाने या मोठ्या बदलासाठी जोरदार तयारी सुरू केली आहे. राज्यात महाराष्ट्र दिनापासून सुरू होणारी "जनगणना" हा केवळ सरकारी उपक्रम न राहता प्रत्येक नागरिकाच्या सहभागातून पूर्ण होणारा 'डिजिटल लोकउत्सव' ठरणार असल्याचे चित्र आहे.

जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, देशाच्या इतिहासातील १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना दोन टप्प्यांत पार पडणार आहे. या डिजिटल संक्रमणासाठी प्रशासनाने मोठी यंत्रणा उभी केली आहे. जिल्ह्यातील १५ तहसीलदार, १६ मुख्याधिकारी आणि पनवेल महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले असून, ६९ क्षेत्रीय प्रशिक्षकांमार्फत ५ हजारांहून अधिक प्रगणक आणि ८६३ पर्यवेक्षकांना प्रशिक्षण दिले जात आहे. मास्टर ट्रेनर प्रकाश संकपाळ, उपविभागीय अधिकारी कर्जत आणि समन्वय अधिकारी हरीष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया वेगाने राबवली जात आहे.

### नागरिक स्वतःच बजावणार भूमिका

यावेळच्या जनगणनेत एक मोठा बदल घडणार आहे. यावेळी सरकारी यंत्रणेसोबत नागरिक स्वतःही प्रगणकाची भूमिका पार पाडणार आहेत. मोबाईल आणि इंटरनेटच्या माध्यमातून स्वतःची माहिती स्वतः भरण्याची संधी प्रथमच उपलब्ध होत असल्याने जनगणना प्रक्रियेला लोकसहभागाचा नवा आयाम मिळणार आहे. पारंपरिक "दारोदार जनगणना" आता "क्लिकवर जनगणना" या स्वरूपात बदलत आहे. १ ते १५ मेदरम्यान नागरिकांना https://se.census.gov.in या संकेतस्थळावर स्वतःची माहिती भरता येणार आहे. यामुळे वेळेची बचत होण्याबरोबरच माहिती अधिक अचूक मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यानंतरही प्रक्रिया थांबणार नाही. ज्यांनी ऑनलाइन माहिती भरली नाही, त्यांच्यापर्यंत प्रगणक प्रत्यक्ष पोहोचणार असून मोबाईल ॲपच्या माध्यमातून माहिती संकलित केली जाईल. म्हणजेच, डिजिटल आणि पारंपरिक पद्धतींचा संगम या जनगणनेत पाहायला मिळणार आहे.

महत्त्वाचे म्हणजे, जनगणनेदरम्यान संकलित होणारी वय, लिंग, शिक्षण, व्यवसाय यांसारखी माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाणार आहे. ही माहिती केवळ सांख्यिकीय विश्लेषण आणि विकास आराखड्यासाठीच वापरली जाणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

"जनगणना ही केवळ आकडेवारी नसून देशाच्या भविष्यासाठीचा आराखडा आहे. रायगडकरांनी डिजिटल माध्यमाचा उपयोग करून अचूक माहिती देत या राष्ट्रीय कार्यात सक्रिय सहभाग नोंदवावा," असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे. दरम्यान, डिजिटल जनगणनेमुळे प्रक्रिया अधिक पारदर्शक, वेगवान आणि अचूक होणार असून, रायगड जिल्हा या बदलासाठी सज्ज असल्याचे जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले.

# ‘श्री भगवंत मंदिर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कामांना मंजुरी देणार’

**सोलापूर : प्रतिनिधी**

बार्शी शहर भगवंत मंदिरासाठी प्रसिद्ध आहे. भगवान विष्णूला समर्पित आणि बाराव्या शतकातील या हेमाडपंती शैलीतील मंदिराचा विकास आराखडा प्रशासनाकडे सादर झालेला आहे. हा आराखडा राज्य शिखर समितीकडे आल्यानंतर त्यात प्रस्तावित केलेली कामे व निधीप्रमाणे शासनाकडून मंजुरी देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.




बार्शी येथील श्री भगवंत मंदिर येथे श्री भगवंत प्रकट दिनानिमित्त आयोजित महापूजा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आली. त्यानंतर बार्शी शहरात प्रधानमंत्री आवास योजना व रमाई आवास योजनेअंतर्गत घरकूल लाभार्थ्यांना मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते घराच्या चावीचे वितरण करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, सोलापूर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य, धाराशीव जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा अर्चनाताई पाटील, माजी आमदार राजेंद्र राऊत, सोलापूर जिल्हाधिकारी कार्तिकियेन एस.बार्शी नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष श्रीमती तेजस्वीनी कथले आदी उपस्थित होते.

प्राचीन काळापासून आलेल्या लोकपरंपरा, अध्यात्म तसेच ऐतिहासिक व सांस्कृतिक ठेवा जपणे हे गरजेचे आहे. या सांस्कृतिक ठेव्याला जनतेपर्यंत आणण्यासाठी तयार करण्यात आलेल्या आराखड्याला मान्यता देण्यात येईल आणि श्री भगवंत मंदिर तीर्थ क्षेत्र विकास आराखडयातून या भागाचा विकास करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

प्रारंभी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते श्री भगवंत यांची महापूजा व आरती करण्यात आली.

## ज्वेलर्स दुकाने फोडण्याचा चोरट्यांचा प्रयत्न निष्फळ

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील काही ज्वेलर्स दुकानांना लक्ष्य करत चोरट्यांनी ती फोडण्याचा प्रयत्न केल्याची घटना मंगळवार २८ एप्रिलच्या सकाळी उघडकीस आली . या प्रकारामुळे शहरातील व्यावसायिकांमध्ये मात्र काहीसे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

महाड शहरातील तांबट आळी परिसरातील कौशल ज्वेलर्स, चवदार तळे परिसरातील कृष्णा ज्वेलर्स तसेच श्री वीरेश्वर मंदिराजवळील सिद्धिविनायक ज्वेलर्स या दुकानांवर चोरट्यांनी डोळा ठेवत शटर तोडण्याचा प्रयत्न केला. यापैकी कृष्णा ज्वेलर्सचे शटर तोडण्यात चोरटे अपयशी ठरले.

कौशल ज्वेलर्स येथे चोरट्यांनी शटर तोडण्यात यश मिळवले, मात्र आतील सुरक्षा व्यवस्था चोख असल्याने चोरीचा प्रयत्न फसला, तर सिद्धिविनायक ज्वेलर्स येथे सध्या ज्वेलर्सचा व्यवसाय बंद असून त्या ठिकाणी कटलरी दुकान सुरू असल्याने तेथेही चोरीचा प्रयत्न निष्फळ ठरल्याचे दिसून आले आहे.




घटनेची माहिती मिळताच महाड शहर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली असून पुढील तपास सुरू आहे. अचानक झालेल्या या घटनेमुळे महाडमधील व्यापाऱ्यांमध्ये मात्र चिंतेचे वातावरण पसरले आहे.

## आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडेंची रायगड जिल्हा रुग्णालयाला आकस्मिक भेट

### आरोग्य आयुक्तांसमोरच रुग्णांनी मांडली व्यथा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राज्याच्या आरोग्य सेवा आयुक्त आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानच्या संचालक डॉ. कादंबरी बलकवडे यांनी नुकतीच जिल्हा रुग्णालयाला आकस्मिक भेट देऊन आरोग्य व्यवस्थेचा आढावा घेतला. या दौऱ्यात रुग्णालयातील औषधांच्या तुटवड्याचे विदारक चित्र समोर आले. संतप्त रुग्णांनी थेट आयुक्तांसमोरच औषधे मिळत नसल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.



जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना साध्या रक्तदाबाच्या गोळ्या, खोकल्याचे औषधही उपलब्ध नसल्याची धक्कादायक माहिती डॉ. कादंबरी बलकवडे यांच्या भेटीत समोर आली आहे. तपासणीनंतर डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे रुग्णालयातील फार्मसीमध्ये मिळत नसल्याने गरीब रुग्णांना बाहेरून महागडी औषधे विकत घ्यावी लागत आहेत. डॉ. बलकवडे रुग्णालयाची पाहणी करत असतानाच, काही रुग्णांनी त्यांना अडवून औषधे मिळत नसल्याची तक्रार केली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. निशिकांत पाटील , अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. शितल जोशी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर , जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. चेतना पाटील उपस्थित होते.

## भारताचे हितशत्रू आपल्याच देशात आहेत –डॉ. उदय निरगुडकर

**अलिबाग : प्रतिनिधी**

भारतात मनोव्यापारशास्त्राने लढलेजाणारे जाणारे युध्द सुरू आहे. समाज माध्यमांचा वापर करून आल्या देशातील लोकांची मानसिकता बदलवली जात आहे. त्यासाठी आपल्याचा देशातील लोकांचा वापर केला जात आहे. भारताचे हितशत्रू आपल्याच देशात आहेत. भारताच्या विकासाच्याआड येणाऱ्यांचे मसूबे उधळवून टाकले पाहिजेत. आपल्या देशाचा विकास करायचा असेल, आपला देश पुन्हा आर्थिक गुलाम बनवायचा नसेल तर आपल्यात एकजूट ठेवली पाहिजे, असे मत ज्येष्ठ पत्रकार डॉ. उदय निरगुडकर यांनी व्यक्त केले.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचा उपक्रम असलेल्या कमळ कला व क्रीडा मंचातर्फे सोमवारी (दि. २७) देश विघातक नरेटीवचा पर्दापाश आणि २०४७ चा विकसित भारत या विषयावर डॉ. उदय निरगुडकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी त्यांनी आपले विचार व्यक्त केले.



आर्थिक प्रगत असलेल देश भारतात मनोव्यापर युध्द खेळत आहेत. या लोकांना अधिकार नकोत, जबाबदऱ्या नकोत. त्यांना आर्थिक लाभ हवेत. त्यांना केवळ नियंत्रण हवय. त्यासाठी ते लोकांपासून सत्य लपवतात. लोकांमध्ये संभ्रम निर्माण करतात. लोकांना आपल्या देशातील सरकारविरूध्द भडकवतात. छोटी – छोटी आंदोलन करायला लावतात. यासाठी ते आपल्या देशातील लोकांचाच वापर करत आहेत. ही धोक्याची घंटा आहे. हे ओळखून आपण सावध राहीले पाहिजे,असे डॉ. उदय निरगुडकर म्हणाले.

१७५० पर्यंत जागाच्या व्यापरात भारताचा २४ टक्के वाटा असायाचा. तो हळूहळू कमी होत गेला. प्लासीच्या लढाईनंतर चित्र बदलले. भारताची लूट झाली. त्यामुळे भारतांचा व्यापार बंद झला. जागाशी असलेला भारतीयांचा संपर्क तुटला. भारत आर्थिक गुलाम बनला. भारतीयांची मानसीकता बदलली. माणासे मानाने खचली. खचलेल्या मनासकितेमुळे भारत मागे पडला. तो उभा राहू शकला नाही, असे ते म्हणाले.

आता परिस्थिती बदलत आहे. सॉफ्टवेअर सेक्टरमुळे भारत आर्थिक दृष्ट्या मजूबत बनत आहे. भारत सरकाने चांगले आर्थिक निणर्य घेतले आहेत. त्यामुळे भारत पुन्हा विकासाच्या मार्गावर आला आहे. ही भारतची प्रगती काही देशांना खुपते आहे. त्यामुळे हे देश भारतातील लोकांचा वापर करून ही प्रगती रोखण्याचा प्रयत्न करत आहेत. जर या देशाला पुन्हा आर्थिक गुलाम बनवायचे नसेल तर आपल्यात एकी ठेवली पाहिजे, असे डॉ. उदय निरगुडकर म्हाणाले.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष नंदकुमार चाळके यांनी डॉ. उदय निरगुडकर यांचे स्वागत केले.कमळ कला व क्रीडा मंचाच्या अध्यक्ष ॲड. पल्लवी तुळपुळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला.

## कोकण भवनात लोकसेवा हक्क दिन उत्साहात साजरा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ ची प्रभावी अंमलबजावणी आणि नागरिकांना मिळणाऱ्या सेवा अधिक पारदर्शक तसेच कालबद्ध पद्धतीने मिळाव्यात, या उद्देशाने आज २८ एप्रिल २०२६ रोजी कोकण भवन येथील विविध शासकीय कार्यालयांमध्ये 'लोकसेवा हक्क दिन' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.



कोकण महसूली विभाग राज्य सेवा हक्क आयोगाचे आयुक्त बलदेव सिंह यांच्या नेतृत्वात आणि लोक सेवा हक्क दिनानिमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात कोकण भवनातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय कामकाजात कोणत्याही प्रकारचा विलंब, अडथळा किंवा भ्रष्टाचार होणार नाही, अशी ग्वाही देत सामूहिक शपथ घेतली.

कोकण विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमातील तरतुदींचे पालन करत पात्र नागरिकांना विहित कालमर्यादेत आणि सौजन्याने सेवा देण्यास कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

राज्य सेवा हक्क आयोगाच्या सह सचिव रिना फणसेकर यांच्या संकल्पनेतून कोकण भवनाच्या दर्शनी भागात या दिनाचे औचित्य साधून आकर्षक रांगोळी आणि माहितीपर स्टँडीज लावण्यात आल्या होत्या. तसेच, कामानिमित्त आलेल्या नागरिकांना लोकसेवा हक्क अधिनियमाच्या प्रतींचे वाटप करून त्यांना कायद्याने प्रदान केलेल्या अधिकारांची माहिती देण्यात आली.

या दिनानिमित्त राबवण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये 'आदर्श आपले सरकार सेवा केंद्राचे' उद्घाटन करण्यात आले. नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येक कार्यालयात अधिसूचित सेवा आणि शुल्काची माहिती देणारे, तसेच तक्रार नोंदवण्यासाठीचे QR Codes लावण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, जिल्ह्यात 'सेवादूत योजना' सुरू करण्यात आली असून, नागरिकांना SMS द्वारे 'आपले सरकार' पोर्टल आणि कायद्याची माहिती देऊन जागृत करण्यात आले.

शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा आणि परिसंवादांचे आयोजन करण्यात आले होते

## विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांच्या हस्ते १ मे रोजी ध्वजारोहण


**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्याच्या ६७ व्या स्थापना दिनानिमित्त कोकण विभागीय स्तरावरील शासकीय ध्वजारोहण शुक्रवार दि.१ मे, २०२६ रोजी सकाळी ८ वाजता विभागीय महसूल आयुक्त रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) यांच्या हस्ते कळंबोली सेक्टर १७ येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर होणार आहे.

महाराष्ट्र राज्यच्या ६७ व्या स्थापना दिनाचा हा सोहळा सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करुन यशस्वीरित्या व उत्साहात साजरा होणार आहे. राष्ट्रध्वज वंदन व संचलन समारंभास नागरिक, पत्रकार, शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी राष्ट्रीय पोषाखात उपस्थित राहावे.

यासोबतच सुरक्षिततेच्या दृष्टीने कृपया कोणतीही बॅग सोबत आणू नये, उन्हाची तीव्रता लक्षात घेता उपस्थितांनी आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## रायगडातील १८ ग्रामपंचायतींत पोटनिवडणूकीसाठी शांततेत मतदान; आज मतमोजणी



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील १८ ग्रामपंचायतींमध्ये पोट निवडणूकीसाठी मंगळवारी शांततेत मतदान झाले. २९ एप्रिल रोजी मतमोजणी होईल.

अलिबागम तालुक्यातील वैजाळी, नागाव, खंडाळे, मुरूड तालुक्यातील एकदरा, काशिद, मांडला, कर्जत तालुक्यातील पालेतर्फे कोतवाल खलाटी, खालापूर तालुक्यातील होराळे, माणगाव तालुक्यातील वणीमलई कोंड, राहा तालुक्यातील पुई, महाड तालुक्यातील मोहोप्रे, ताम्हाणे, वराठी, पोलादपूर तालुक्यातील महालगूर, तुर्भे बुद्रुक, म्हसळा तालुक्यातील घोणसे, श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर, बागमांडला या ग्रामपंचातींमध्ये पोटनिवडणुकीसाठी मंगळवारी मतदान झाले.

कडक उन्हाळयात देखील मतदारांनी मतदान केले. काही ग्रामपंचायतींमध्ये मतदारांनी रांगलावल्या होत्या. अलिबाग तालुक्यतील खंडाळे ग्रामपंचातीतमध्ये मतदारांनी रांगा लावल्या होत्या. दुपारी ३.३० वाजेपर्यंत ५८.५७ टक्के मतदान झाले होते. जिल्ह्यात कोणताही अनुचित प्रकार नघडता शांततेत मतदान झाले.



## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजनेत १०० टक्के उद्दिष्टपूर्ती

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करणाऱ्या प्रमुख बँक अधिकारी व शाखा व्यवस्थापकांचा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी विभागीय व्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया,विलास शिंदेविभागीय व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया,दीपा सहानी,अग्रणी बँक व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया,विजयकुमार कुलकर्णी,व्यवस्थापकीय संचालक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक,मंदार वर्तक तसेच विविध बँकांचे शाखा व्यवस्थापक उपस्थित होते.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी बँक अधिकाऱ्यांनी दिलेल्या उत्कृष्ट सहकार्याबद्दल जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्वांचे अभिनंदन केले. तसेच सन २०२६–२७ या आर्थिक वर्षासाठी प्राप्त उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी सर्व बँकांनी कृती आराखडा तयार करून नियोजित वेळेत उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी दिले.कार्यक्रमाच्या शेवटी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड जी. एस. हरळय्या,यांनी उपस्थितांचे अभिनंदन करून आभार मानले.

पान १ वरुन

## अरविंद म्हात्रेंकडून नागरिकांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न

अरविंद म्हात्रे यांच्यावर टीका करत, “अभ्यास न करता आरोप करणे योग्य नाही. उचली जीभ लावली टाळ्याला असे प्रकार विरोधी पक्षनेत्यांनी करू नयेत,” असे सांगितले. तसेच, त्यांनी पुढे म्हटले की, “विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे हे कायमच चांगल्या कामांना विरोध करत आले आहेत, मात्र आम्ही जनतेची सेवा करत राहणार असून, जनतेचा एकाही रुपया वाया जाऊ देणार नाही.” लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली विकासकामे सुरू राहतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

या पत्रकार परिषदेला नगरसेवक तथा स्थायी समिती सदस्य अजय बहिरा उपस्थित होते. पत्रकार परिषदेत यांनी अरविंद म्हात्रे यांनी केलेल्या सर्व आरोपांचे खंडन करत ते पूर्णतः असत्य असल्याचा पुनरुच्चार सभागृह नेते प्रकाश बिनेदार आणि स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांनी केला.

## अलिबाग येथे कोकण विभागातील पहिला अमृत आनंद मेळा उत्साहात

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील वरसोली, अलिबाग येथे कोकण विभागातील पहिला ‘अमृत आनंद मेळा’ अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत ) च्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या ‘अमृत वर्ग’ या किशोर विकास उपक्रमांतर्गत आयोजित या निवासी मेळाव्याला मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शारंग हॉलिडे होम, वरसोली येथे १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी सुरू झालेला हा मेळावा १४ एप्रिलपर्यंत विविध उपक्रमांनी रंगला. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते सुतार काका व अविनाश धाट काका यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व भारतमातेच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून करण्यात आली.

या मेळाव्यात बौद्धिक खेळ, संस्कारमूल्ये रुजविणारे उपक्रम, शारीरिक क्रियाकलाप तसेच प्रेरणादायी सत्रांचा समावेश होता. गुंजाळ ताईंनी मुलींकरिता स्वसंरक्षणाच्या दृष्टीने लाठी–काठी प्रशिक्षणाची ओळख करून दिली. सायंकाळी रामरक्षा, मारुती स्तोत्र आणि रामनाम जप अशा धार्मिक उपक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी अनघा मराठे यांनी शारीरिक प्रशिक्षण सत्र घेतले तर श्रीनिवास केळकर गुरुजी यांनी आध्यात्मिक मार्गदर्शन केले. विश्व हिंदू परिषदचे ॲड. श्रीराम ठोसर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या बालपणावर आधारित संवाद साधत मुलांमध्ये विचारमंथन घडवले. तसेच सनातन संस्थेच्या सौ. विशाखा आठवले यांनी हिंदू संस्कृतीचे महत्त्व पटवून दिले. मातृ प्रतिष्ठान, चौल येथील अजिंक्य शिंत्रे यांनी मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकासासाठी आवश्यक व्यायाम व सवयींबाबत मार्गदर्शन केले.

श्री स्वामी विवेकानंद समितीच्या श्रीमती गोखले आजी वय ७५ नागाव अलिबाग त्यांनी दुपारच्या सत्रामध्ये स्वामी विवेकानंद यांच्या गोष्टी सांगितल्या. मुंबई आकाशवाणीच्या वृत्तविभाग प्रमुख सौ. संगीता गोडबोले यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मुलांशी संवाद साधत अभ्यास पद्धती व विषयांबद्दल मार्गदर्शन केले.

## दुखवटा

### नामुबाई म्हात्रे



**उरण :** करंजाडे –पनवेल येथील नामुबाई महादेव म्हात्रे (वय ९०) यांचे रविवारी (२६) वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.उरण मधिल ज्येष्ठ पत्रकार मधुकर ठाकूर यांच्या त्या ज्येष्ठ भगिनी होत.त्यांच्या पार्थिवावर रविवारी करंजाडे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना,जावई,नातवंडे असा परिवार आहे.

### प्रफुल्ल पुरो



**उरण :** तालुका रिक्षा युनियनचे संस्थापक, विद्यमान अध्यक्ष तथा नागाव–म्हातवलीतील ज्येष्ठ समाज कार्यकर्ते प्रफुल्ल किशोर पुरो यांचे सोमवारी दीर्घ आजाराने देहावसान झाले. मृत्यू समयी ते ७५ वर्षांचे होते. जेष्ठ पत्रकार प्रवीण पुरो यांचे ते ज्येष्ठ बंधू होत. त्यांच्या पश्चात भाऊ, बहीण,पत्नी, पुत्र, दोन मुली, जावई असा परिवार आहे.

# अतिउष्णतेमुळे तरुण फुटपाथवर कोसळला

## सायन–पनवेल महामार्गावरील घटना; पोलिसांच्या तत्परतेने वाचला जीव



**कळंबोली : बातमीदार**

सायन–पनवेल महामार्गावर खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत पुण्याकडे जाणाऱ्या मार्गावर उष्णतेमुळे एक धक्कादायक घटना घडली. दुचाकीवरून प्रवास करत असताना एका तरुणाला अचानक उष्णतेचा फटका बसल्याने त्याची प्रकृती बिघडली आणि तो रस्त्याच्या कडेला थांबून काही क्षणातच फुटपाथवर कोसळला.

या घटनेमुळे परिसरात काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुण सायनपनवेल महामार्गावरून पुण्याकडे जात होता. दुपारच्या तीव्र उकाड्यामुळे आणि वाढलेल्या तापमानामुळे त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागले. परिस्थिती गंभीर होत असल्याची जाणीव होताच त्याने तत्काळ दुचाकी रस्त्याच्या कडेला उभी केली; मात्र काही क्षणातच त्याला चक्कर येऊन तो फुटपाथवर कोसळला. घटनेचे गांभीर्य ओळखून स्थानिक नागरिकांनी तातडीने मदतीसाठी धाव घेतली.

जवळच वाहतूक नियंत्रणासाठी उभ्या असलेल्या पोलिसांना त्यांनी आवाज देऊन बोलावले. वाहतूक पोलिस सागर ठाकूर, सुधीर राठोड, अश्विनी राठोड आणि रामेश्वर खताळ यांनी कोणताही वेळ न दवडता तत्परतेने त्या तरुणाला उचलून जवळील एमजीएम रुग्णालयात दाखल केले. रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर संबंधित तरुणाची प्रकृती स्थिर असल्याची माहिती वैद्यकीय सूत्रांकडून मिळाली आहे. वेळेवर मिळालेल्या मदतीमुळे मोठा अनर्थ टळल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, नवी मुंबई आणि पनवेल परिसरात गेल्या काही दिवसांपासून तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या पुढे गेला असून उष्णतेचा प्रचंड कहर सुरू आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिका प्रशासनाकडून नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात आले आहे. गरज असेल तरच दुपारच्या वेळेत घराबाहेर पडावे, पुरेसे पाणी पिणे, डोक्यावर संरक्षण ठेवणे तसेच उन्हापासून बचाव करण्याच्या उपाययोजना कराव्यात, असे आवाहन पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांनी केले आहे. तसेच या घटनेत दाखवलेल्या तत्परतेबद्दल नवी मुंबई पोलीस उपआयुक्त (DCP) यांनी वाहतूक पोलिस सागर ठाकूर, सुधीर राठोड, अश्विनी राठोड आणि रामेश्वर खताळ यांच्या कामगिरीचे विशेष कौतुक केले आहे. त्यांच्या वेळीच केलेल्या मदतीमुळे त्या तरुणाचा जीव वाचल्याची भावना व्यक्त करण्यात आली आहे.

# पनवेल-रोहा आणि पनवेल-कर्जत रेल्वे मार्गावर उड्डाणपूल मंजूर करण्याची मागणी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नैना अधिसूचित क्षेत्रात उसर्ली खुर्द येथे पनवेल रोहा (कोकण रेल्वे) आणि पनवेल कर्जत रेल्वे या दोन्ही रेल्वे मार्गांवर उड्डाणपूल मंजूर करण्याची मागणी ग्रुप ग्रामपंचायत उसर्ली खुर्दच्या सरपंच अनिता नितीन भगत यांनी सिडको तसेच विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांच्याकडे पत्राद्वारे केली.

सध्या अस्तित्वात असलेली रेल्वे लाईन आणि नवीन रेल्वे लाईन या रेल्वे लाईनमुळे रेल्वे फाटक कायमस्वरूपी बंद अवस्थेत असते. दर पाच ते दहा मिनिटांनी अप अँड डाऊन रेल्वे लोकल, मालगाडी, गुड सेवा, एक्सप्रेस, वाहतूक असल्याने या रस्त्यामध्ये जाणे येणे अत्यंत कठीण आणि अवघड होत आहे. पनवेल कर्जत कॉर्ड लाईनसाठी भू संपादन होत आहे. या लाईनमुळे टीपीएस सात मधील प्रस्ताविक राष्ट्रीय महामार्ग ४ ते इतर जिल्हा क्रमांक १८, ओएनजीसी उसर्ली खुर्द ते शिवकर रस्ता वीस मीटर बाधित होत आहे. सदरचे संपादन हे रेल्वेकडून होणार आहे. त्यानुसार जमीन मालकांच्या हरकती मागवण्यात येऊन हरकतींच्या सुनावण्या सुरू झाल्या आहेत.

पनवेल–रोहा रेल्वे मार्गावरील उसर्ली खुर्दचे रेल्वे फाटक नेहमी बंद असल्याने दोन्ही रेल्वे मार्गावर उड्डाणपूल होणे आवश्यक आहे. उड्डाणपूल सध्या अस्तित्वात असलेल्या ओएनजीसी रोड, धुरी प्रेमनगर ते सप्रे वाडा या मार्गावर झाले तर भविष्यात दोन्ही मार्गावर रेल्वे बाधित रस्त्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटू शकेल. त्यामुळे रेल्वेच्या दोन्ही मार्गांवर उसर्ली खुर्द येथे उड्डाणपूल मंजूर करावे अशी मागणी प्रभारी सरपंच यांनी केली आहे.

# कळंबोली परिसरातील कचरा व ड्रेनेज समस्येवर तत्काळ कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका कळंबोली प्रभाग क्रमांक ८ मधील के.एल.२ सेक्टर ५ परिसरात कचरा साचणे आणि ड्रेनेज लाईन बंद होण्याच्या समस्येमुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. दुर्गंधी, अस्वच्छता आणि आरोग्याच्या समस्या वाढण्याची भीती निर्माण झाली होती. या पार्श्वभूमीवर स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक रामदास शेवाळे यांच्याकडे निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

नागरिकांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत नगरसेवक शेवाळे यांनी केवळ आश्वासन देऊन थांबण्याऐवजी प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन परिस्थितीची पाहणी केली. "आश्वासनपूर्ती आणि प्रत्यक्ष काम" या भूमिकेची प्रचिती देत त्यांनी तत्काळ पनवेल महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधून समस्येची माहिती दिली आणि त्वरित कारवाईचे निर्देश दिले.

त्यांच्या पुढाकारामुळे प्रशासनाने कोणताही विलंब न करता के.एल.२ परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेतली. साचलेला कचरा तातडीने हटवण्यात आला असून बंद पडलेल्या ड्रेनेज लाईनची दुरुस्तीही युद्धपातळीवर सुरू करण्यात आली आहे. यामुळे परिसरातील अस्वच्छता कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळाला आहे.

सध्या या भागात साफसफाई आणि ड्रेनेज दुरुस्तीची कामे वेगाने सुरू असून परिस्थितीत लक्षणीय सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. स्थानिक रहिवाशांनी नगरसेवक शेवाळे यांच्या तत्परतेचे आणि कार्यक्षमतेचे कौतुक करत मनापासून आभार व्यक्त केले आहेत. या तातडीच्या कारवाईमुळे परिसरातील स्वच्छता सुधारण्यास मदत होणार असून भविष्यात अशा समस्या निर्माण होऊ नयेत यासाठी प्रशासनाने नियमित देखरेख ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे. नगरसेवक शेवाळे यांनीही नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले आहे.

# विमान बघण्यासाठी आणि रील काढण्यासाठी गर्दी

## अपघात घडण्याची भीती



**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू झाल्यापासून विमान लँडिंग आणि टेक ऑफ होताना बघण्यासाठी तसेच त्याचा व्हिडीओ काढण्यासाठी आणि रील करण्यासाठी पनवेल टी पॉईंट येथे नागरिक गर्दी करत आहेत. त्यामुळे येथे अपघात होत आहेत. या ठिकाणी होत असलेली गर्दी पोलिसांच्या डोक्याला ताप ठरत आहे.

काही महिन्यांपूर्वी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लोकार्पण झाले त्यानंतर या ठिकाणाहून विमान उड्डाण सुरू झाले पनवेल मधील टी पॉइंट जवळील ब्रिजवरून मोठ्या प्रमाणात विमान याचा करताना दिसून येतात त्यामुळे नागरिक या ठिकाणी थांबून विमानाचे लँडिंग आणि टेकऑफ चे व्हिडिओ घेतात विमान दिसल्यानंतर नागरिकांना या ठिकाणी थांबण्याचा मोह आवरत नाही, मात्र नागरिकांचे हे रस्त्यावर वाहन पार करून थांबणे धोकादायक ठरत आहेत.

आत्तापर्यंत या टी पॉईंट जवळ तीन गंभीर स्वरूपाचे अपघात झाले आहेत. रस्त्यावर वाहन पार करून नागरिकांचे थांबण्याचे प्रमाण वाढल्याने पोलिसांसाठी ही गर्दी डोकेदुखी ठरत आहे. पोलिसांनी येथे नागरिकांना हटवण्याचे काम करावे लागत आहे. वाढती गर्दी लक्षात घेता या ठिकाणी भविष्यात मोठा अपघात होऊ शकतो. नॅशनल हायवे प्रशासनाला व्हिव कटर बसवण्याची मागणी पोलिसांनी केली आहे. जेणेकरून नागरिकांचे अपघात होणार नाहीत.

संध्याकाळच्या वेळेला या ठिकाणी नयनरम्य वातावरण असते. विमान उड्डाण घेतानाचे दृश्य मनमोहक असते. त्यामुळे अनेक प्रवासी या ठिकाणी थांबतात. मात्र हे थांबणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे नागरिकांनी या ठिकाणी थांबू नये असे आवाहन पनवेल शहर पोलीस आणि पनवेल वाहतूक पोलिसांनी केले आहे.

# पनवेलमध्ये ब्रह्माकुमारीजतर्फे किड्स समर कॅम्प उत्साहात



**उरण : बातमीदार**

पनवेल येथील ब्रह्मा कुमारीस केंद्रात २४, २५ व २६ एप्रिल २०२६ दरम्यान सायंकाळी ५ ते ७ या वेळेत ३ दिवसीय किड्स समर कॅम्प उत्साहात पार पडला. या शिबिरात मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पहिल्या दिवशी शिबिराची सुरुवात झाली.बीके दिशा देवकर बहन यांनी मुलांकडून व्यायाम करून घेत केली. त्यानंतर बीके डॉ. अंजली सुंकले बहन यांनी "डिजिटल डिटॉक्स" या विषयावर मार्गदर्शन केले. त्यांनी मुलांकडून एक खेळ करून घेतला, ज्यातून मोबाईल गेम्सपेक्षा शारीरिक हालचालींचे महत्त्व पटवून दिले. तसेच मुलांकडून डिजिटल डिटॉक्सची प्रतिज्ञा करून घेतली व पालकांनाही मार्गदर्शन केले.

पुढे बीके सुलक्षणा बहन यांनी "मी कोण?" या विषयावर आत्म्याचे स्वरूप समजावून सांगितले. दुसऱ्या दिवशी बीके तारा दिदी व सेवाधारी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून दिवसाची सुरुवात झाली. बीके पल्लवी बहन यांनी मुलांकडून झुंबा डान्स करून घेतला. त्यानंतर बीके सुनंदा दिदींनी परमात्म्याचा परिचय करून दिला. बीके अनिता दिदींनी राजयोग मेडिटेशनची माहिती देत त्याचे प्रात्यक्षिक सादर केले.

पुढे बीके दिशा तिवारी बहन यांनी मुलांना विविध विषयांवर चित्रकला करण्यासाठी प्रोत्साहित केले. मुलांकडून व्हॅल्यू–बेस्ड गेम्स खेळवण्यात आले आणि शेवटी सर्वांना प्रसाद देण्यात आला. तिसरा दिवशी म्हणजेच शेवटच्या दिवशी व्यायामाने सुरुवात झाली. बीके सुनंदा दिदींनी चार युगांची माहिती गाणे व नृत्याच्या माध्यमातून दिली. बीके डॉ. विजय भाई यांनी हेल्दी लाईफस्टाइलवर मार्गदर्शन करत दिवसाची योग्य दिनचर्या कशी असावी हे सांगितले.

मुलांसाठी भावनांवर आधारित एक खेळ आयोजित करण्यात आला. त्यानंतर आत्म्याच्या सात गुणांची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी पनवेल ब्रह्माकुमारीज सेंटरच्या इंचार्ज बीके तारा दिदी यांच्या हस्ते दररोज काढलेल्या लकी ड्रॉमधून तीन मुलांना बक्षिसे देण्यात आली. तसेच "शिवबाबा" कडून सकाळी उठल्यापासून शक्ती कशी घ्यावी, दिवसभराचा दिनचर्या चार्ट कसा सादर करावा आणि दिवसभर परमात्म्याची आठवण कशी ठेवावी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. चित्रकला स्पर्धेतही तीन विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली, तसेच सर्व सहभागी मुलांना भेटवस्तू देण्यात आल्या.

यावेळी मुलांकडून "लेटर टू गॉड" लिहून घेण्यात आले आणि सर्वांना ब्रह्माकुमारीजचे आशीर्वाद देण्यात आले. बीके सुलक्षणा बहन यांनी मुलांकडून राजयोग मेडिटेशन करून घेतले, तर संजय भाई यांनी प्रेरणादायी कविता सादर केली. अशा प्रकारे किड्स समर कॅम्प आनंददायी वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला.

# पनवेल महानगरपालिकेतर्फे सेवा हक्क दिनानिमित्त विविध कार्यक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगाच्या वतीने २८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिन म्हणून साजरा करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागाच्या निर्देशानुसार पनवेल महापालिकेच्यावतीने लोकसेवा हक्क दिनानिमित्त शपथ घेण्यात आली.

यावेळी महापालिकेचे सभागृह नेते प्रकाश बिनेदार, आयुक्त मंगेश चितळे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, स्वरूप खारगे, नानासाहेब कामठे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, लेखाधिकारी संग्राम व्होरकाटे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, सामान्य विभाग प्रमुख किर्ती महाजन, महापालिकेचे सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

महापालिकेच्यावतीने 'पनवेल कनेक्ट ॲप' सुरू करण्यात आले असून या ॲपच्या माध्यमातून नागरिकांना सुमारे ६२ सेवा दिल्या जात आहेत. महापालिकेच्या विविध सेवांच्या माध्यमातून कारभार अधिकाधिक लोकाभिमुख, उत्तरदायी, पारदर्शक करण्याच्यादृष्टीने भर देण्यात येत आहे. २८ एप्रिल हा दिवस लोकशाही हक्क अधिनियम २०१५च्या अंमलबजावणीचा स्मरणदिन म्हणून साजरा करण्याबाबत शासनाने आदेशित करण्यात आले आहे,

# सोन्याचा साज घेऊन बहावा फुलला



**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

नैसर्गिक सौंदर्याची उधळण लाभलेल्या कोकणातील माळ रानात..डोंगर दऱ्यांबरोबर गावाकडच्या रानमोळ रस्त्यांवर सध्या निसर्गाच्या विविध रंगांची उधळण सुरू झालेली दिसून येत आहे. ग्रीष्माच्या तप्त लहरींचा सामना करीत अनेक वृक्षवल्ली विविधरंगी साज घेऊन सजलेल्या दिसून येत आहेत. आपल्या सोनेरी पिवळ्या रंगाची उधळण करीत बहावा बहराने सजला असून त्याच्या मोहक सौंदर्याने अनेकाना भुरळ घातल्याचे दिसून येत आहे.

बहावा हा आपल्या कोकण पट्टीतील महत्वाचा रानवृक्ष असून आपल्या हिरव्यागार पर्णबहारा बरोबरच आपल्या फिक्कट पिवळ्या खोडामुळे त्याचे अस्तित्व अधोरेखित होत असते.सह्याद्रीच्या कुशीतील डोंगर रांगांमध्ये ऐन उन्हाळ्यात बहावा बहरतो तेव्हा डोंगरात सोन्याची उधळण झाली आहे असे वाटते.पिवळ्या कोमल फुलांच्या लांबच लांब घोसाने हा वृक्ष सजून जातो.आयुर्वेदात या वृक्षाला अनन्य साधारण महत्व आहे.

बहावा चे प्रमुख औषधी गुणधर्म:: बहाव्याच्या शेंगांचा गर पोट साफ करण्यासाठी, मळ मऊ करण्यासाठी आणि बद्धकोष्ठतेपासून आराम मिळवण्यासाठी सर्वोत्तम मानला जातो.

याच्या पानांचा आणि फुलांचा लेप खाज, त्वचेची जळजळ, नायटा (Ringworm) आणि इतर त्वचारोगांवर गुणकारी आहे. बहावा पित्त आणि कफ कमी करतो. पोटदुखी, अपचन आणि गॅसची समस्या दूर करण्यासाठी याचा उपयोग होतो.हा कावीळ आणि यकृताच्या इतर समस्यांवर रामबाण उपाय आहे. जखमा लवकर भरून काढण्यासाठी आणि सूज कमी करण्यासाठी याच्या पानांचा लेप लावतात. याच्या मुळ्यांचा काढा घशाच्या गाठी (Tonsils) आणि खोकल्यासारख्या श्वसनाच्या विकारांवर अत्यंत गुणकारी आहे.

बहावा फक्त सौंदर्याचे प्रतीक नाही तर आपल्या आजारांवर असणारे रामबाण औषध असल्याने हा वृक्ष संजीवनी समान आहे. मधल्या काळात वृक्षतोड होत असताना बहाव्याची पण कत्तल झाली, मात्र सध्याच्या निसर्ग प्रेमींना बहाव्याच्या सौंदर्याने भूल घातल्याने सध्या गावखेड्यातील रस्त्यांबरोबरच शहरातील बागांमध्ये हा वृक्ष आपल्या सौंदर्याची उधळण करताना दिसत आहे.

# सीकेटी विद्यालयाचे शिक्षक समूहगीत स्पर्धेत अव्वल





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील इंग्रजी विभागातील शिक्षकांनी संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५ व्या वाढदिवसाचे औचित्य साधत मोरू नारायण म्हात्रे विद्यालय, गव्हाण कोपर यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या शिक्षकांसाठी तालुकास्तरीय समूह गीत स्पर्धेचे आयोजन केले होते.

स्पर्धेसाठी चांगू काना ठाकूर विद्यालयातील संगीत शिक्षक रुपेश मढवी यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या व्यक्तिमत्वावर आधारित गीताच्या सादरीकरणामुळे समस्त श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत अव्वल नंबर मिळवून शाळेची ख्याती चारी दिशांना पसरविली.

स्पर्धेसाठी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या जवळ जवळ आठ शाळेतील शिक्षकांच्या ग्रुप्सने सहभाग घेतला होता. शिक्षकांच्या या घवघवीत यशामुळे चांगू काना ठाकूर विद्यालयाचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि जे. बी.एस.पी.संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या सदस्या वर्षा ठाकूर यांनी विजेत्या शिक्षकांचे विशेष कौतुक करत शाब्बासकीची थाप दिली.

तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाइस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे , संस्थेचे सर्व पदाधिकारी, इंग्रजी माध्यम माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण,इंग्रजी माध्यमाच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे , इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधुरी, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी विजेत्या ग्रुपचे विशेष अभिनंदन केले.

## संपादकीय

# भविष्याची दिशा ओळखणारी 'चतुराई'

आजच्या डिजिटल क्रांतीच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता केवळ तांत्रिक प्रगतीपुरती राहिलेली नाही. ती समाजव्यवस्थेच्या प्रत्येक स्तरावर परिणाम घडवू लागली आहे. नव्या संधींचा मार्ग मोकळा करणाऱ्या महाचतुर चॅटबॉटने हे दाखवून दिले आहे.

**काळ कधीच कोणासाठी थांबत नाही. काळाचे कोणावाचून काही अडतही नसते, मात्र काळाविना सगळ्यांचेच काही अडत असते. म्हणूनच काळाचे बोट धरून त्याच्यासोबत चालण्यात शहाणपण असते. काळ कधी मागे वळून पाहात नाही. तो पुढेच जात असल्याने, त्याच्यासोबत चालणाऱ्यालाही पुढेच जावे लागते. मात्र पुढे जात असला, तरी त्याच्या वाटचालीची एकच दिशा नसते. तो असंख्य दिशांनी चालत असतो. अशा वेळी कोणत्या दिशेने जाणाऱ्या काळाचे बोट धरावयाचे याचा निर्णय घेण्याचे तारतम्य माणसाने दाखवायचे असते. म्हणजे, केवळ काळासोबत चालणे एवढेच पुरेसे नसते, तर काळाची दिशा ओळखून त्या दिशेने चालणे महत्वाचे असते. व्यवहाराच्या भाषेत याला केवळ 'शहाणपण' नव्हे, तर 'चतुराई' असे म्हणतात. आजकाल केवळ शहाणपण अंगी असून चालत नाही. त्याला चतुराईची जोड असेल, तर काळाचे बोट धरून नेमक्या दिशेला जाण्याचा रस्ता अगोदरच ओळखता येतो. अलीकडे तर, काळाची भविष्याची वाटचाल अगोदरच ध्यानात घेऊन त्याप्रमाणे आपल्या वाटचालीची दिशा निवडली नाही तर रस्ता चुकण्याचीच शक्यता असल्याने, नेमका रस्ता पकडण्यासाठी भविष्याचा वेध घेण्याची चतुराई ही व्यावहारिक गरज झालेली आहे. कधीकधी असा नेमका रस्ता ओळखणे माणसाच्या बुद्धीच्या आणि आकलनाच्या पलीकडे असते. त्याची नैसर्गिक बुद्धी काम करत नाही, आणि कितीही विचारपूर्वक रस्ता निवडला तरी ती निवड चुकीची ठरल्यानंतर पश्चात्तापाचीही वेळ येते. अशा वेळी, नैसर्गिक बुद्धीला साथ देणारे 'कृत्रिम बुद्धिमत्ता' नावाचे एक साधन तंत्रज्ञानाने माणसास बहाल करून ठेवले आहे, आणि महाराष्ट्राने त्या साधनाचा चतुराईने वापर करण्याचे ठरविले आहे. हा योग सहसा दुर्मीळ असतो, पण असा वापर करण्याची चतुराई महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने दाखविल्यामुळे भविष्यातील संधींच्या शोधात असलेल्यांना भरकटण्याची वेळ येणार नाही. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साह्याने रोजगाराच्या क्षेत्रात नावीन्यपूर्ण बदल घडविण्यासाठी आणि रोजगारक्षम उमेदवारांचा वेळ वाचविण्यासाठी फडणवीस सरकारने तयार केलेल्या 'महा-चतुर चॅटबॉट' नावाच्या तंत्रज्ञानाचे सोमवारी लोकार्पण करण्यात आले, तेव्हा काळाची पावले ओळखण्याची चतुराई दाखविणाऱ्या सरकारचे काळाने खचितच कौतुक केले असेल. कौशल्य, रोजगार, उद्योजकता, यांना नवी गती देण्यासाठी, रोजगाराच्या शोधातील युवकांना त्यासाठीचे मार्गदर्शन करण्यासाठी 'महा-चतुर चॅटबॉट' हा परिवर्तनकारी उपक्रम सुरू करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. भविष्याचा नेमका वेध घेण्यासाठी आणि भविष्यकाळाकडे वाटचाल करणाऱ्या काळाच्या पावलांची नेमकी दिशा निवडण्यासाठी दाखविलेली ही 'महा-चतुराई' निश्चितच वाखाणण्याजोगी आहे. शिक्षण ते रोजगार हा प्रवास काळाच्या वर्तमानाच्या वाटचालीसोबत होत असतो. भविष्याची वाट निवडण्याची वेळ येते, तेव्हा त्या निर्णयाचे नेमके भान राखणे हे मात्र आव्हान असते. अलीकडच्या झपाट्याने बदलत चाललेल्या तंत्रयुगात तर हे आव्हान अधिकच बिकट झालेले आहे. त्यामुळे, भविष्याच्या प्रवासाची नेमकी दिशा दाखविण्याचे कामदेखील महाराष्ट्राचे हे 'महा-चतुर चॅटबॉट' करणार आहे. हा केवळ रोजगाराच्या संधी शोधण्याकरिता उपयुक्त ठरणारा उपक्रम नाही, तर यामुळे उद्योगांनाही कुशल मनुष्यबळ प्राप्त होणार असल्याने, नव्या भविष्याची पायाभरणीदेखील सरकारने 'चतुराई'ने केली आहे.**

# डोक्यावरचा हंडा काढा; पाणीपुरवठ्याचे नियोजन करा



स्वयंपाकापासून ते सांडपाण्यापर्यंत घरात पाणी आहे की नाही हे पाहण्याची जबाबदारी भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये पिढ्यानपिढ्या महिलांनी सांभाळली आहे. आजही अनेकांना आपली आई, बहीण किंवा आजी डोक्यावर हंडा, कळशी किंवा घागर घेऊन लांबवरून पाणी आणतानाचे प्रसंग आठवते. भारतात आता हे चित्र कालबाह्य झाले तरी जगभरात अधिकही अनेक देशात नागरिक शुद्ध व नियमित पाणीपुरवठ्यापासून वंचित आहेत. त्यामुळे यंदा २२ मार्चला जागतिक जल दिवस साजरा करताना संयुक्त राष्ट्राने पाणी व्यवस्थापनात महिला सक्षमीकरणाला प्राधान्य दिले आहे.

भारताने पेयजलाच्या क्षेत्रात मोठी प्रगती केली आहे.घराघरांत नळाद्वारे पाणी पोहोचवण्यासाठी जलजीवन मिशन प्रभावीपणे राबविण्यात आले. तरीही काही भागांत पाणीटंचाई कायम आहे आणि त्याचा सर्वाधिक भार महिलांवरच पडतो. ही समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नसून जागतिक पातळीवरही ती तितकीच गंभीर आहे. म्हणूनच यंदाचा जागतिक जल दिवस "पाणी आणि महिला सक्षमीकरण" या व्यापक संकल्पनेशी जोडून साजरा केला जात आहे.

**जलसंकट : असमानतेचा प्रश्न**

पृथ्वीवरील सुमारे ७१ टक्के भाग पाण्याने व्यापलेला असला, तरी त्यातील केवळ २.५ टक्के पाणी गोड आहे. त्यातीलही अत्यल्प भाग मानवाच्या वापरासाठी उपलब्ध आहे. त्यामुळे पाण्याची विपुलता ही केवळ भास आहे. हवामान बदल, लोकसंख्यावाढ,औद्योगिकीकरण आणि शहरीकरण यामुळे पाण्याची मागणी वाढत असताना उपलब्धतेत आणि वितरणात मोठी असमानता निर्माण झाली आहे. या असमानतेचा सर्वाधिक फटका स्त्रिया आणि मुलींना बसतो.

**पाणीटंचाईत महिलांचे सर्वाधिक शोषण**

संयुक्त राष्ट्रांच्या अहवालांनुसार, जगभरातील १ अब्जाहून अधिक स्त्रिया अजूनही सुरक्षित पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहेत. सुमारे १.८ अब्ज लोकांच्या घराजवळ पाणी उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत प्रत्येक तीन घरांपैकी दोन घरांमध्ये पाणी आणण्याची जबाबदारी महिलांवर असते. ५३ देशांतील आकडेवारीनुसार स्त्रिया आणि मुली दररोज एकत्रितपणे सुमारे २५० दशलक्ष तास पाणी आणण्यात खर्च करतात. ही वेळ शिक्षण, रोजगार किंवा वैयक्तिक विकासासाठी वापरता आली असती.

अशुद्ध पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दररोज सुमारे १,००० बालकांचा मृत्यू होतो. याशिवाय जगातील सुमारे १४ टक्के देशांमध्ये पाणी व्यवस्थापनाच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचा समान सहभाग निश्चित करणारी ठोस यंत्रणा नाही.

हे आकडे स्पष्ट करतात की जलसंकट हा केवळ नैसर्गिक प्रश्न नसून तो सामाजिक, आर्थिक आणि लिंगभेद करणारा आहे.

**महिला जलव्यवस्थापनाच्या केंद्रस्थानी हव्यात**

भारतीय संविधानामुळे स्त्री-पुरुष समानतेचा पाया मजबूत झाला आहे.आज महिला उद्योग, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांत नेतृत्व करत आहेत. पाणी व्यवस्थापनातही त्यांचा अनुभव अमूल्य आहे.मात्र ही स्त्री समानता आत्ता जलव्यवस्थापनातही आणणे केवळ आपल्याच देशाची नाही तर जगभराची गरज बनली आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मते, जलव्यवस्थापनात महिलांचा सहभाग वाढल्यास सेवा अधिक शाश्वत, समावेशक आणि प्रभावी ठरतात. त्यामुळे महिलांना 'पाणी आणणाऱ्या भूमिकेतून 'पाणी नियोजन करणाऱ्या भूमिकेत आणणे आवश्यक आहे.

**पाणी आणि अर्थव्यवस्था : अदृश्य नाते**

पाणी हे जीवनाचेच नव्हे तर अर्थव्यवस्थेचेही मूलभूत साधन आहे. जगभरात उपलब्ध शुद्ध पाण्यापैकी सुमारे ७० टक्के पाणी शेतीसाठी वापरले जाते, तर उद्योग आणि ऊर्जा क्षेत्रालाही मोठ्या प्रमाणावर पाण्याची गरज असते.

ज्या देशांनी प्रभावी जलव्यवस्थापन केले, तेथे आर्थिक प्रगती वेगाने झाली. इस्रायलने ठिबक सिंचन, सिंगापूरने सांडपाण्याचा पुनर्वापर, नेदरलँडने पूर नियंत्रण आणि ऑस्ट्रेलियाने जलसंधारण धोरण यशस्वीपणे राबविले. ही उदाहरणे योग्य नियोजनाचे महत्त्व अधोरेखित करतात.

**जागतिक उपाययोजना : बदलाची दिशा**

पाण्याच्या समस्येवर उपाय म्हणून विविध स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. समुद्राच्या खाऱ्या पाण्याचे गोड्या पाण्यात रूपांतर (डिसॅलिनेशन), सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर, तसेच नदी पुनरुज्जीवन प्रकल्प यांवर भर दिला जात आहे.

महाराष्ट्रातील नागपूर येथे सांडपाण्याचा औद्योगिक वापर केला जातो, तर नवी मुंबईचे सांडपाणी व्यवस्थापन आदर्श मानले जाते. याशिवाय वृक्षारोपण आणि जलसंधारण हे पर्यावरणीय संतुलनासाठी अत्यावश्यक उपाय आहेत.

**पाणी अडवा पाणी जिरवा : प्रभावी उपाय**

पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे ही जलसंधारणाची सर्वात प्रभावी पद्धत आहे. यामुळे भूजल पातळी वाढते, विहिरी जिवंत राहतात आणि शेतीसाठी पाणी उपलब्ध होते.

शहरी भागातही रेनवॉटर हार्वेस्टिंग अनिवार्य करणे आवश्यक आहे. शासनाने नव्या बांधकामांसाठी ही अट बंधनकारक केली आहे, ही सकारात्मक बाब आहे.

**भारतातील प्रयत्न : धोरण आणि अंमलबजावणी**

भारत सरकारने पाणी व्यवस्थापनासाठी विविध योजना राबवल्या आहेतजल जीवन मिशन प्रत्येक जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना,मुख्यमंत्री जलसंधारण योजना,नमामि गंगे योजना अशा कितीतरी योजनांमधून केंद्र व राज्य शासन जनतेला शुद्ध पेयजल उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

**प्रत्येक नागरिकाची भूमिका**

शासन स्तरावर विविध योजना राबविण्यात येत असल्या तरी सामान्य नागरिकांनीही या मोहिमेत एक जबाबदार नागरिक म्हणून पुढे येणे गरजेचे आहे.पाणी वाचवण्याची सुरुवात शासनाकडून नव्हे, तर घरापासून होते. आपण काही सोपे उपाय अवलंबू शकतो.जसे की,नळ आणि पाईप गळती त्वरित दुरुस्त करणे,रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे, सांडपाण्याचा पुनर्वापर,ठिबक सिंचनाचा वापर पाण्याचा अपव्यय टाळणे,वृक्षारोपण करणे,घरातील पाणी व्यवस्थापनात महिलांचा निर्णयाधिकार मान्य करणे,पाणी हा केवळ नैसर्गिक संसाधन नसून तो मानवी हक्क, सामाजिक न्याय आणि लिंगसमतेचा आधार आहे. जलसंकटाचा विचार करताना समतेचा दृष्टिकोन आवश्यक आहे. तसा विचार रुजवणे.यासोबतच घराघरात केवळ पाण्याच्या उपलब्धतेसाठी महिलांचे शोषण होणार नाही याची काळजी घेण्याचाही आजचा दिवस आहे. चला !तर महिलांच्या डोक्यावरचा हंडा काढूया आणि जल जीवन मिशन, अटल भूजल योजना,जलशक्ती अभियान,स्वच्छ भारत मिशन,महाराष्ट्र ग्रामीण पाणी पुरवठा योजना, विविध जलसंधारण योजनेच्या माध्यमातून पाणी टंचाई मुक्त समाज निर्मितीसाठी पुढे येऊया.. कारण पाणी वाचवणे म्हणजेच समाजाचे भविष्य सुरक्षित करणे होय.

**-प्रवीण टाके, उपसंचालक (माहिती) विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर**

## बदलते तंत्रज्ञान

# वॉरंटी नसतानाही बदलून मिळेल स्क्रीन आणि बॅटरी

सॅमसंग ग्रीन लाइन इश्यू असणाऱ्या फोन्सची स्क्रीन मोफत रिप्लेस करत आहे. तसेच फ्री बॅटरी आणि किट रिप्लेसमेंट देखील देत आहे. सॅमसंगची हा ऑफर आउट ऑफ वॉरंटी डिवाइसेससाठी देखील आहे.



सॅमसंग बदलेल मोफत स्क्रीन जर...

सॅमसंगच्या प्रीमियम स्मार्टफोन्स गॅलेक्सी एस २१ सीरीज आणि गॅलेक्सी एस २२ सीरीजच्या डिस्प्लेमध्ये ग्रीन लाइनची समस्या येत आहे. फोनमध्ये येणारी ही समस्या यावर्षीच्या सुरुवातीपासून येत असल्याची माहिती अनेक रिपोर्ट्स मधून समोर आली आहे. डिस्प्लेमध्ये आलेल्या या बिघाडामुळे युजर्सची चिंता वाढली होती. आता कंपनीनं या फोनच्या युजर्सना मोठा दिलासा दिला आहे. सॅमसंग ग्रीन लाइन इश्यू असलेल्या सर्व फोन्सची स्क्रीन मोफत मध्ये रिप्लेस (फ्री-ऑफ-कॉस्ट वन-टाइम रिप्लेसमेंट) करेल. सॅम मोबाइलच्या रिपोर्टनुसार सॅमसंगच्या या ऑफरचा फायदा आउट ऑफ वॉरंटी डिवाइसेस देखील घेऊ शकतात.

**फ्री बॅटरी आणि किट रिप्लेसमेंट**

विशेष म्हणजे कंपनी ग्रीन लाइन इश्यू असलेल्या फोन्सच्या स्क्रीन रिप्लेसमेंटसह मोफत बॅटरी आणि किट रिप्लेसमेंट देखील देत आहे. युजर या ऑफरचा फायदा ३० एप्रिल पर्यंत घेऊ शकतात. या सर्व्हिससाठी युजर्सना सॅमसंग सर्व्हिस सेंटर जावं लागेल. सॅमसंगच्या सुपर अॅमोलेड डिस्प्ले असलेल्या फोन्समध्ये ही समस्या गेली अनेक दिवस येत आहे. यामुळे कंपनीला काही मार्केट्समध्ये वन-टाइम फ्री स्क्रीन रिप्लेसमेंट द्यावी लागली आहे. गॅलेक्सी एस२० सीरीज आणि नोट२० सीरीजमध्ये देखील ही समस्या येत होती.

**येत आहे गॅलेक्सी एफ५५**

सॅमसंग सध्या आपल्या गॅलेक्सी एफ सीरीजचा नवीन फोन गॅलेक्सी एफ५५ लॉंच करण्याची तयारी करत आहे. गुगल प्ले कंसोलच्या लिस्टिंगमध्ये गॅलेक्सी एफ५५ चे जे फीचर आणि स्पेसिफिकेशन सांगण्यात आले आहेत, त्यानुसार हा अलीकडेच आलेल्या गॅलेक्सी एम५५ ५जी चा रीब्रँडेड व्हर्जन असू शकतो. गॅलेक्सी एफ५५ मध्ये कंपनी प्रोसेसर म्हणून स्नॅपड्रॅगन ७ जेन १ चिपसेट देणार आहे. फोन ८जीबी रॅमसह येईल, याचा डिस्प्ले १२०हर्ट्झच्या रिफ्रेश रेटला सपोर्ट करेल. गॅलेक्सी एफ५५ ला इखड म्हणजे ब्यूरो ऑफ इंडियन स्टॅंडर्ड्स वरदेखील लिस्ट झाला आहे

# सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा



## निमित्त

राजा रवि वर्मा हे भारताच्या त्रावणकोरच्या राजघराण्यातील एक चित्रकार होते. त्यांनी भारतीय साहित्य आणि संस्कृतीतील पात्रांची रंगीत चित्रे काढली. राजा रवि वर्मा यांनी काढलेल्या चित्रांनंतरच हिंदूंना आपले देव कसे दिसत असावेत ते समजले. भारतातील परंपरागत हिंदू महाकाव्ये आणि पुराणांतील कथा यांवर रवि वर्मा यांनी काढलेली चित्रे आजही प्रमाण मानली जातात.

राजा रवि वर्मा यांचा जन्म २९ एप्रिल १८४८ रोजी केरळमधील कोईल तंपुरन येतील किलिमनूर राजवाड्यात झाला. त्यांचे वडील मोठे विद्वान व आई कवयित्री होती. राजा रवि वर्मा यांना सी.गोडा वर्मा नावाचा भाऊ व मंगला नावाची बहीण होती. त्यांच्या बालपणीच त्यांना महाराज अलियम् तिरुनल या त्यांच्या नातलग राजाचा आश्रय मिळाला. रवि वर्मा यांचे काका उत्तम चित्रकार होते. तो चित्रकलेचा वारसा पुतण्यात उतरला. याशिवाय तिरुवनंतपुरमच्या राजदरबारी असणारे इंग्रज चित्रकार थी ओडेर जेन्सन, रामस्वामी नायडू यांच्या चित्रकारितेचा प्रभाव त्यांच्यावर पडला. त्रावणकोर महाराजांच्या प्रोत्साहनामुळे त्याला अधिकच प्रेरणा मिळाली. ते त्रावणकोरचे राजचित्रकार बनले.


१८७३ मध्ये मद्रास येथील चित्रकलेच्या स्पर्धेत रवि वर्मा यांनी सुवर्णपदक मिळवले. महाराजांच्या दरबारात असणार्या इटालियन तैलचित्रांकडे पाहून त्यांनी तैलचित्रे काढण्याचे ठरवले. राजा रवि वर्मा यांच्या चित्रांत एक सुंदर, प्रमाणबद्ध व सौंदर्यवती साडी नेसलेली स्त्री असते. त्यांचा स्टुडिओ महाराष्ट्रात लोणावळ्याला होता. तेव्हा दिसलेल्या मराठी स्त्रियांकडे पाहून त्यांनी तशाच स्त्रिया चित्रांत रंगवल्या. राजा रवि वर्मा यांनी चित्रांतील विविध विषयांसाठी भारतभर प्रवास केला. त्याचे 'दुष्यंत व शकुन्तला', 'नल व दमयंती, या विषयावरील चित्रे प्रसिद्ध आहेत. त्यांच्या चित्रांनी भारतीयांना त्यांच्या धर्मग्रंथांतील दृश्ये डोळ्यासमोर साकार झाली.

ही त्यांची चित्रे सर्व भारतभर प्रसिद्ध झाली. आधुनिक भारतीय वास्तववादी चित्रकलेचा जनक म्हणून राजा रवि वर्मा यांचे नाव घेतले जाते. युरोपियन चित्रकारांप्रमाणे 'कमिशन पोट्रेट' काढणारे ते पहिले भारतीय चित्रकार. त्यांच्या चित्रकलेवर पाश्चात्त्यांचा पगडा असला तरी त्यांची चित्रे मात्र अस्सल भारतीय होती. रामायण-महाभारतातील प्रसंग, विश्वामित्र-मेनका, दुष्यंत-शकुंतला, उर्वशी-पुरुरवा अशी एकापेक्षा एक सरस चित्रे आपल्या वास्तववादी शैलीच्या कलाकृतीतून चितारली आहेत. आपली चित्रे छापण्यासाठी त्यांनी लोणावळ्याजवळील मळवली येथे शिळा (प्रेस) छापखाना उभारला. या छापखान्यातून हजारो देवदेवतांची चित्रे सार्या भारतभर पूजली जाऊ लागली. देवतांना मानवी चेहरे देण्याचे काम रवि वर्मा यांनी केले.

आपल्या चित्रांतून भारतीय संस्कृतीचा ठसा जगात पोहचविणार्या रवि वर्मा यांना अनेक मानसन्मान मिळाले. शिकागोच्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनात स्थान मिळवणारे ते एकमेव. सातव्या एडवर्डने 'कैसर-ए-हिंद' हा पुरस्कार देऊन त्यांना गौरविले होते. त्या काळात देशविदेशातील राजांचे राजवाडे राजा रवि वर्मा यांच्या चित्रांच्या दालनांनी सजले होते. त्यांच्या चित्रातून मानवी स्वभावाच्या भावना, छटा सहजसुंदरतेने दर्शविल्या. अशा या महान चित्रकाराचे २ ऑक्टोबर १९०६ रोजी निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# उन्हाळ्यात केस गळतीची समस्या कशी टाळावी?

उन्हाळ्यात घाम येत असल्याने अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. त्यापैकीच एक समस्या म्हणजे कोंडा होणे किंवा केस गळणे. कोंडा झाल्याने डोक्याला खाज सुटते आणि हळूहळू केस गळती सुरू होती. केस गळतीमुळे अनेकांना टक्कल पडण्याची समस्यांचा सामना करावा लागतो. केस गळती होऊ नये म्हणून काय करावे जाणून घ्या तज्ज्ञ काय सांगतात.



उन्हाळयामध्ये अनेकांना केसांची समस्या ही उद्‌भवू शकते. यामध्ये तेलकट टाळू, घाम आणि धूळ यामुळे कोंडा, खाज सुटणे आणि केस गळती याचा समावेश असतो. याची नेमकी कारणे काय? आणि कशा प्रकारची खबरदारी घ्यायला हवी, जाणून घ्या.

केस गळण्याचे कारण म्हणजे शरीरात काही आवश्यक पोषक तत्वांची कमतरता हे आहे. काही लोक केसांमध्ये कोंडा झाल्यास लिंबू लावतात, परंतु असे अजिबात करू नये. यामुळे नंतर समस्या निर्माण होतात. ओले केस जास्त वेळ बांधून ठेवू नयेत.

**उपाय :-** जेव्हा उन्हाळ्यातील उष्णता असह्य होते तेव्हा आपल्या केसांचे नुकसान होण्यापासून संरक्षण करणे महत्वाचे आहे. टोपी घालून किंवा डोके झाकण्यासाठी स्कार्फचा वापर करणे सूर्यप्रकाशात जाणे टाळणे गरजेचे आहे. कडक उन्हामुळे केस मुळांपासून कमकुवत होतात. त्यामुळेही केस गळणे वाढू शकते. डिहायड्रेशनचा परिणाम केवळ तुमच्या संपूर्ण आरोग्यावरच नाही तर केसांच्या आरोग्यावरही होतो. भरपूर पाणी प्या आणि केसांच्या वाढीस प्रोत्साहन देणारे जीवनसत्त्वे ए, सी आणि ई जीवनसत्वाने समृद्ध असलेले पदार्थांचा आहारात समावेश करा.

फळे, भाज्या आणि प्रथिने यांचा समावेश असलेला आहार हा तुमच्या केसांना निरोगी राहण्यासाठी मदत करतो आणि आवश्यक पोषक तत्त्वे पुरवतो. त्यामुळे तुम्ही केसगळती रोखू शकाल आणि केस मजबूत होण्यास यामुळे मदत मिळू शकते. केस गळण्याची समस्या टाळण्यासाठी कांद्याचा रस अतिशय प्रभावी आहे. यात सल्फरचे प्रमाण चांगले असते, ज्यामुळे टाळूतील रक्ताभिसरण वाढते. ज्यामुळे केसांची वाढ होते. याव्यतिरिक्त कांद्याच्या रसात अँटी-फंगल गुणधर्मदेखील असतात, जे टाळूशी संबंधित समस्या दूर करतात.

# चवदार तळ्याच्या कामांना वेग, मात्र नव्या पायऱ्यांची मोडतोड; नागरिकामध्ये संताप

**महाड : प्रतिनिधी**

चवदार तळे येथे सुरू असलेल्या पाणी उपसा व गाळ काढण्याच्या कामाला वेग आला असून तळ्यातील विहिरी पुन्हा नागरिकांच्या नजरेस पडू लागल्या आहेत. मात्र, नव्याने बांधण्यात आलेल्या पायऱ्यांची जेसीबीच्या वापरामुळे मोडतोड झाल्याने नागरिकांत नाराजी व्यक्त होत आहे.



चवदार तळे सत्याग्रहाच्या शतकपूर्ती वर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत सुमारे ५५ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात तळ्यातील पाणी उपसा करून गाळ काढण्याचे काम सुरू आहे. काही दिवसांपूर्वीच या कामाचा शुभारंभ नगराध्यक्ष, नगरसेवक तसेच पालिका प्रशासनाच्या उपस्थितीत झाला. सुमारे एक कोटी रुपयांच्या खर्चातून तळ्यातील पाणी काढून गाळ हटवण्याची प्रक्रिया राबवली जात आहे.

दरम्यान, पाणी उपसा सुरू झाल्याने परिसरातील विहिरी व कूपनलिकांच्या पाण्याच्या पातळीत लक्षणीय घट झाल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी दिली आहे. यामुळे परिसरात पाणीटंचाईची शक्यता निर्माण झाली आहे.तळ्यातील एकूण ११ विहिरी सध्या स्पष्टपणे दिसत असून, ऐतिहासिकदृष्ट्या १४ विहिरींमुळे 'चवदार तळे' हे नाव प्रचलित असल्याचे सांगितले जाते.

दरम्यान, गाळ काढण्यासाठी जेसीबीचा वापर करताना नव्याने दुरुस्त केलेल्या पायऱ्यांवरून यंत्र उतरविण्यात आल्याने पायऱ्यांचे नुकसान झाले आहे. अवघ्या पाच महिन्यांतच पायऱ्यांची मोडतोड झाल्याने खर्च वाया गेल्याची भावना नागरिकांत व्यक्त होत असून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

चवदार तळे सत्याग्रह नंतर या ठिकाणाला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले. आगामी शतकपूर्ती वर्षाच्या निमित्ताने या परिसराचा विकास करण्यासाठी विशेष प्रकल्प हाती घेण्यात आला आहे.

मंत्री भरत गोगावले यांच्या पुढाकारातून व मंत्री संजय शिरसाट यांच्या माध्यमातून उपलब्ध निधीतून हा प्रकल्प राबविला जात आहे. पुढील टप्प्यात तळ्याचे सुशोभीकरण व जलशुद्धीकरणाची कामे करण्यात येणार आहेत.

अमृतसर येथील सरोवराच्या धर्तीवर आधुनिक जलशुद्धीकरण प्रणाली उभारून चवदार तळ्याचा सर्वांगीण विकास करण्याचा शासनाचा मानस असून, यामुळे महाडमध्ये भव्य व आकर्षक ऐतिहासिक स्मारक उभारले जाईल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

महाडच्या २ किमी परिसरातील जागेवर चवदार तळे येथील गाळ टाकण्यासाठी जागेची पाहिणी करण्यात येत असल्याची माहिती महाड नगरपालिकाचे मुख्याधिकारी धनंजय कोळेकर यांनी प्रस्तुत प्रतिनिधी जवळ बोलताना दिली ज्या गाळ काढल्यानंतर इतर कामांना सुरवात करण्यात येणार आहे

## खोपोली-पेण रस्त्यावर डंपरला आग; सुदैवाने जीवितहानी नाही

**चौक : प्रतिनिधी**

खोपोली पेण रस्त्यावर वडवळ गावच्या हद्दीत एम.एस.ई.बी.ची विद्युत पुरवठा करणारी वायर टच झाल्यामुळे एका डंपरला आग लागून डंपर आगीच्या भक्षस्थानी पडला.

.खालापूर पोलीस, हेल्प फाऊंडेशन खोपोली यांची टीम घटनास्थळी दाखल झाली. एम.एस.ई.बी.ची विद्युत पुरवठा करणारी वायर टच झाल्यामुळे डंपरला आग लागलेली होती. अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे.MH/४८/AG/७४०० डंपर चा नंबर आहे.वाहन चालक याला शॉक लागल्याने खोपोली नगर पालिका दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे,

खोपोली नगर पालिका, टाटा स्टील व अन्य कंपनीचे अग्निशमन दल दाखल झाले असून, विद्युत पुरवठा सुरू असल्याने पाणी मारू शकत नसल्याने आग वाढून डंपर आगीच्या भक्षस्थानी पडला.विद्युत पुरवठा खंडित करण्याचे काम लवकर झाले नाही.

मातीने भरलेला डंपर खाली करताना जवळच असलेल्या विद्युत वाहिनीकडे दुर्लक्ष झाल्याने ही घटना घडली आहे. त्यामुळे चालकाला देखील शॉक लागला आहे. अशी जीवावर बेतणारी कामे करताना वाहन चालक याच्या जोडीला अन्य मदतनीस असणे आवश्यक आहे. सुदैवाने जिवीत हानी झाली नाही, पण डंपर जळून खाक झाला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार पुढील तपास करीत आहेत.



## ॲड.अनिषा शिंदे यांना एलएलएम परीक्षेत भारती विद्यापीठाचे सुवर्णपदक

**रोहे : प्रतिनिधी**

भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय), पुणे येथील विधी शाखेचा पदवीदान समारंभ जाहीर झाला असून, यात ॲड. अनिषा अनिल शिंदे यांनी एल.एल.एम. (LL.M.) या पदव्युत्तर पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावून सुवर्णपदक (Gold Medal) प्राप्त केले आहे.



अनिषा शिंदे यांनी त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत सातत्य राखत विधी क्षेत्रात हे विशेष प्राविण्य मिळवले आहे. कठीण परिश्रम, विषयाचे सखोल ज्ञान आणि अभ्यासातील चिकाटीच्या जोरावर त्यांनी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत सर्वोच्च स्थान मिळवले.दिनांक २३ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या भारती विद्यापीठाच्या पदवीदान समारंभात केंद्रीय राज्यमंत्री मा.प्रतापराव जाधव आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभाग यांच्या हस्ते त्यांना हे सुवर्णपदक प्रदान करून गौरविण्यात आले.

आपल्या यशाबद्दल बोलताना अनिषा यांनी सांगितले की, "नियोजित अभ्यास आणि प्राध्यापकांचे मार्गदर्शन यामुळेच मी हे यश संपादन करू शकले. कायद्याचा अभ्यास केवळ परीक्षेत गुण मिळवण्यासाठी न करता, त्याचा समाजातील सामान्य घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी कसा वापर करता येईल, यावर माझा भर असेल."

ॲड. अनिषा शिंदे यांच्या या यशाबद्दल विधी क्षेत्रातील दिग्गज, त्यांचे मार्गदर्शक, मित्रपरिवार आणि नातेवाईकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. एक तरुण आणि अभ्यासू वकील म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे.

## 'रिलायन्स'चे रमेश धनावडे यांना रायगड रत्न पुरस्कार

**नागोठणे : बातमीदार**

सत्तावन्न वर्षांची परंपरा असलेल्या संपूर्ण महाराष्ट्रभर पसरलेल्या 'दैनिक महासागर' या वृत्तपत्रा कडून नुकताच नागोठणे येथील रिलायन्स कंपनीचे वरिष्ठ अधिकारी रमेश धनावडे यांना साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल रायगड रत्न' पुरस्कार देऊन सन्मान करून गौरवविण्यात आले.

हा सोहळा चिंतामणराव देशमुख सभागृह रोहा येथे मोठ्या दिमाखात पार पडला. यावेळी व्यासपीठावर टीव्ही ॲक्टर आणि बिग बॉस फेम जानवी किल्लेकर, दैनिक महासागरचे मालक व मुख्य संपादक श्रीकृष्ण चांडक, रोहा नगराध्यक्षा वनश्री शेडगे, माजी आमदार अनिकेत तटकरे, कोकण मराठी साहित्य परिषद अलिबाग तालुका अध्यक्ष साहित्यिक रमेश धनावडे, सिटी बेल चॅनल मालक व पनवेल पत्रकार विकास मंचचे मंदार दोंदे, दैनिक महासागरचे रायगड जिल्हा प्रमुख दत्तात्रेय कुलकर्णी, जेएसडब्ल्यूचे पीआरओ कुमार थत्ते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

धनावडे यांची मनतरंग, उर्मी, जीवनगाणे, कवितेच्या सुरातून, नादखुळा असेच काहीतरी, अशी सहा पुस्तके प्रकाशित असून त्यांचा'जीवनगाणे' स्तंभ दैनिक कृषीवलमध्ये सलग तीन वर्षे प्रसिद्ध होत होता. 'गुदगुल्या' या राजकीय व सामाजिक वात्रटिका दैनिक पुढारीमध्ये प्रसिद्ध झाल्या आहेत. दैनिक रायगड टाईम्ससाठी त्यांच्या 'बी पॉझिटिव्ह' या डिजिटल मुलाखती प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांच्या अनेक दिवाळी अंकांमध्ये कथा, लेख आणि कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचा 'कवितेच्या सुरातून' हा महाराष्ट्रातील प्रख्यात कवींवरील स्तंभ दैनिक पुढारीमध्ये सलग दीड वर्ष प्रसिद्ध झाला आहे.

### TENDER NOTICE

Sealed Tenders are invited from reputed Builders/Developers having similar Experience for the Redevelopment of the **SHREE GANESH PLAZA CO-OP. HOUSING SOCIETY LTD.** Plot No. 1, Sector 1, Khanda Colony, New Panvel (West), Tal. Panvel, Raigad 410206.

(Regd. No. Regd. No. NBOM/CIDCO/HSG (O.H.)/2080/JTR/2005-2006)

| | |
|---|---|
| Plot Area | 1893.77 sqmt. |
| No. of Flats (Residential)<br>No. of Shop/Office (Commercial) | 63 nos<br>51 nos |
| Tender Sale From | 30/04/2026 to 14/05/2026 |
| Tender cost | Rs. 25,000/- Cash or DD (Non-refundable) |
| Tender Submission | Upto 20/05/2026 |

The Applicants interested for the above referred works may contact **SHREE GANESH PLAZA CO-OP. HOUSING SOCIETY LTD.** Plot No. 1, Sector 1, Khanda Colony, New Panvel (West), Tal. Panvel, Raigad 410206. **Mobile No Dhula Kachare 9987747678 (Flat no. A-102) & Mr. Arun Jadhav 9322737605 (Flat no. A-304)** on dates mentioned above during 10 am to 6 pm.

Dated 29/04/2026

**sd/- sd/-**

**Chairman / Secretary**

**SHREE GANESH PLAZA CO-OP. HOUSING SOCIETY LTD.**

Plot No. 1, Sector 1, Khanda Colony, New Panvel (West), Tal. Panvel, Raigad 410206.

## कुहिरेत प्राथमिक आरोग्य केंद्राचे अत्याधुनिक नूतनीकरण

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे परिसरातील कुहिरे गावात रिलायन्स फाउंडेशनच्या माध्यमातून सीएसआर विभाग अंतर्गत रजिपच्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे अत्याधुनिक पद्धतीने नूतनीकरण करण्यात आले असून, या उपक्रमाचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.



या नूतनीकरण केलेल्या आरोग्य केंद्राचे उद्घाटन रिलायन्स कंपनी नागोठणेचे अध्यक्ष शशांक गोयल यांच्या हस्ते मंगळवार, दि. २८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.यावेळी बोलताना शशांक गोयल यांनी सांगितले की, रिलायन्स कंपनी परिसरातील गावांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आम्ही कटीबद्ध आहोत. शिक्षण, आरोग्य आणि मूलभूत सुविधांसाठी आमची टीम सातत्याने कार्यरत आहे. परिसरातील प्रत्येक गावात विकासाची गंगा पोहोचवण्याचा आमचा संकल्प आहे. तसेच, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीसाठी शिष्यवृत्तीची आवश्यकता असल्यास त्यांनी सीएसआर विभागाच्या अधिकारी वरदा कुलकर्णी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

या कार्यक्रमाला रिलायन्स कंपनी नागोठणेचे अध्यक्ष शशांक गोयल, उपाध्यक्ष गौतम मुकर्जी, नागोठणे पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी, डॉ. प्रशांत बारदोलाई, रिलायन्स इंडस्ट्रीज नागोठणेचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे, डॉ. सुनील चौधरी, गडब प्रा. आ. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. संजय गांगुर्डे, कुहिरे प्रा. आ. केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. दीक्षिता मोकल, डॉ. शुभदा कुडतलकर, डॉ. भानू प्रताप, सीएसआर विभागाचे अधिकारी वरदा कुलकर्णी, रॉपस्टन सरेरो, कुहिरे माजी सरपंच युवा सामाजिक कार्यकर्ते उदय जवके, कुहिरे सरपंच प्रज्ञा जवके, कुहीरे ग्रामपंचायत अधिकारी विलास बारकुंड यांच्यासह ग्रामस्थ व रिलायन्स कंपनी नागोठणेचे कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, रिलायन्स कंपनी आणि रिलायन्स फाउंडेशनच्या वतीने ग्रामस्थांसाठी बॉडी मास कंपोझिशन व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माजी सरपंच उदय जवके यांनी केले, या विकासकामामुळ रिलायन्स फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्रात रक्तदान शिबिर

**कर्जत :** सद्गुरु श्री अनिरुद्ध उपासना केंद्र कर्जत, आवळस व नेरळ यांच्या संयुक्त विद्यमाने कर्जत – खालापूर तालुक्यातील सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेले हे ५३९ वे रक्तदान शिबीर ठरले.

शनिमहाराज मंदिरच्या रविकिरण सभागृह मध्ये रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी एकुण ७६ रक्तदात्यानी रक्तदान केले व १९ रक्तदात्यांना रक्तदाब, हिमोग्लोबिन व इतर वैधकीय कारणामुळे रक्तदान करता आले नाही. या रक्तदान शिबिरात एकूण ९५ रक्तदात्यांनी सहभाग घेउन सामाजिक, राष्ट्रीय व मानवतवादी कार्य करून सहकार्य केले.

या रक्तदानाची सुरुवात श्री अनिरुध्द बापु यांची प्रार्थना सर्वं उपस्थित भक्तगणांनी करुन करण्यात आली. याप्रसंगी कर्जत नगरपरिषदे च्या नगराध्यक्षा पुष्पा दगडे, नगरसेविका नेहा शिंदे, नगरसेविका सुचिता खोत, नगसेविका मानसी कानिटकर, नगरसेवक महेंद्र चंदन अनेक भक्तगण उपस्थित होते.

### ग्रुप ग्राम पंचायत ऐनघर

**मु. पो. ऐनघर, ता. रोहा, जि. रायगड.**

ग्रुप ग्रामपंचायत ऐनघर पंचायत हद्दीमधील ग्रामनिधी अंतर्गत विकास कामेकरण्याचे असून सदरची जाहिरात प्रसिद्धी करत आहोत.

- निविदा मागविण्याची तारीख ०४/०५/२०२६ रोजी सायं. ५.०० पर्यंत.
- निविदा उघडण्याची तारीख ०५/०५/२०२६ रोजी दुपारी २.०० पर्यंत.
- उघडलेल्या निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याचे अधिकार प्रशासक ग्रुप ग्रामपंचायत ऐनघर यांना राहिल.

**ग्रामनिधी विकास कामे खालीलप्रमाणे**

| अ.क्र. | वस्तू/साहित्य नाव | अंदाजित साहित्ये तपशील | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| १ | ३६ W LED स्ट्रीट लाईट व साहित्य | २०० | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |
| २ | इन्व्हर्टरची बॅटरी १५० AH/२०० AH | १ नग | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |
| ३ | ऑफीस टेबल व खुर्ची | ४/४ | ग्रामनिधी |
| ४ | कारपेट | १ स्वेअर मिटर | ग्रामनिधी |
| ५ | टि.सी.एल पावडर | १००० किलो | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |
| ६ | मेडिक्लोओर | १३०० नग | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |
| ७ | प्लास्टिक खुर्ची | १०० नग | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती खालील प्रमाणे :-**

१. निविदा दिनांक २८/०४/२०२६ ते ०४/०५/२०२६ पर्यंत सुटीचे दिवस वगळून गामपंचायत कार्यालयात मिळतील.
२. प्रत्येक कामाची निविदा स्वतंत्र असावी व सोबत GST प्रमाणपत्र पॅनकार्ड सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रमाणपत्र / रजिस्टर ठेकेदार एकत्र लखोट्यात असावे.
३. पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाही.
४. सर्व निविदा मोहोरबंद असाव्या.
५. निविदा धारकास आपले संपर्क नंबर निविदा वरती देण्यात यावे. जेणे करून निविदा उघडण्याचे कालावधी आपणास कळविण्यात येईल.
६. सदर वस्तू आवश्यकते नुसार मागविण्याचा अधिकार प्रशासक यांच्याकडे राहिल.

**सही/-**
**श्री. गोविंद शिद**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रामपंचायत ऐनघर**
**ता. रोहा जिल्हा रायगड**

**सही/-**
**सौ. कलावती राजेंद्र कोकळे**
**प्रशासक**
**ग्रामपंचायत ऐनघर**
**ता. रोहा जिल्हा रायगड**

**जा. क्र. : १९३४/२०२६/२७**
**दिनांक :- २८/०४/२०२६**

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे, को मौजे-चिरनेर, तालुका-उरण जिल्हा रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत **१) श्री यशवंत अनंत पाटील, २) श्री. धनवंत अनंत पाटील, ३) श्रीमती सुवर्णा जयवंत पाटील, ४) श्रीमती रेश्मा मनोहर भोईर, ५) श्रीमती रेखा ऋषिकेश ओवळेकर आणि ६) श्री सुरज कृष्णा पाटील** यांचे सातबारा सदरील नावे असलेल्या, त्याच्या वहिवाटीतील व ताबे कब्जातील तसेच त्याच्या सामाईक मालकीची ही शेतजमिन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिरनेर, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट नंबर हिस्सा नंबर | भु-धारणा पध्दती | क्षेत्रफळ (हे आर.पॉ) | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| २२५/२९ | भोगवटादार वर्ग-१ | ०-१२-००<br>पो. खराबा ०-०१-००<br>एकूण ०-१३-००<br>पैकी ०-०६-५० | ०.३४ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी सदरहू मिळकतीच्या मालकानी दिलेली आहे तरीही वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहीवाट ताबा, कब्जा इजमेंट, गहाण साठेकरार फरोक्त, दान, बक्षिस चार्ज अटॅचमेंट, लीज दावा वगैरे अशा संदर्भात कोणत्याही प्रकारची हारत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यामह खालील पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने लेखी हरकती दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे

वरिल मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा अगर हितसंबंध नाही, असे समजून आमने अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
तारिख : २७/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. सुभाष किसन वास्कर**
**(वकील)**

कार्यालयः ८८. पहिला मजला बिल्डिंग नं. ३. पनवेल महानगरपालिका संकुल तालुका-पनवेल, जिल्हा रायगड नवी मुंबई ४००२०६ मोबाईलः ८१६९४२६२९६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येत आहे. की मौजे चिरनेर तालुका उरण, जिल्हा रायगड येथील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत **१) श्रीमती यमुनाबाई नागा पाटील, २) श्री. पांडुरंग नागा पाटील, ३) श्री. बाळकृष्ण नागा पाटील, ४) श्रीमती बेबीबाई धाकटया घरत ५) श्रीमती गंगाबाई कृष्णा फुडेकर आणि ६) श्रीमती जनाबाई महादेव घरत** यांचे सातबारा सदरील नावे असलेल्या त्याच्या वहिवाटीतील व तावे. कब्जातील तसेच त्याच्या सामाईक मालकीची ही शेतजमिन मिळकत आमचे अशिलानी कायमस्वरूपी खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चिरनेर, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट नंबर हिस्सा नंबर | भु-धारणा पध्दती | क्षेत्रफळ (हे आर.पॉ) | आकार रु.पै |
|---|---|---|---|
| २२५/३३ | भोगवटादार वर्ग-१ | ०-०७-००<br>पो. खराबा ०-००-००<br>एकूण ०-०७-०० | ०.२२ |

सदर मिळकत निर्वेध असल्याची हमी सदरहू मिळकतीच्या मालकानी दिलेली आहे तरीही वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहीवाट ताबा, कब्जा इजमेंट, गहाण साठेकरार फरोक्त, दान, बक्षिस चार्ज अटॅचमेंट, लीज दावा वगैरे अशा संदर्भात कोणत्याही प्रकारची हारत असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ (सात) दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यामह खालील पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने लेखी हरकती दाखल कराव्यात अगर समक्ष येऊन भेटावे

वरिल मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत तक्रार न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा अगर हितसंबंध नाही, असे समजून आमने अशिल सदरहू मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल, याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण : पनवेल**
तारिख : २७/०४/२०२६

**सही/-**
**ॲड. सुभाष किसन वास्कर**
**(वकील)**

कार्यालयः ८८. पहिला मजला बिल्डिंग नं. ३. पनवेल महानगरपालिका संकुल तालुका-पनवेल, जिल्हा रायगड नवी मुंबई ४००२०६ मोबाईलः ८१६९४२६२९६

# कडक उन्हाचा पशु-पक्ष्यांनाही फटका

## हीट स्ट्रोकची लक्षणे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाढत्या उष्णतेचा परिणाम आता फक्त माणसांपुरता मर्यादित न राहता मुक्या प्राण्यांवर आणि पक्ष्यांवरही गंभीरपणे होत आहे. उष्णतेच्या तीव्र लाटेमुळे घार (काइट्स), कबूतर आणि कावळे अशा पक्ष्यांना डिहायड्रेशन व अशक्तपणामुळे उपचारासाठी आणावे लागले. तसेच सुमारे कुत्रे आणि मांजरींमध्ये हीट स्ट्रोकची लक्षणे आढळून आली आहेत.

डॉ. मयूर डंगर यांनी सांगितले की, हीट स्ट्रोकच्या प्रकरणांमध्ये प्राण्यांचे शरीराचे तापमान धोकादायक पातळीपर्यंत वाढते. "कुत्र्यांमध्ये तापमान १०२ ते १०४ डिग्रीपर्यंत



पोहोचते. ते वेगाने श्वास घेतात, डोळे लाल होतात आणि तोंडातून जास्त लाळ गळते," असे त्यांनी स्पष्ट केले. उपचारांमध्ये प्रथम प्राण्यांचे शरीर थंड करण्यावर भर दिला जातो. ओल्या कापडाने शरीर झाकून तापमान कमी केले जाते, त्यानंतर सलाइन व मल्टीव्हिटामिनद्वारे शरीरातील पाण्याची कमतरता भरून काढली जाते.

तज्ज्ञांच्या मते, वेळेवर उपचार न मिळाल्यास हीट स्ट्रोक जीवघेणा ठरू शकतो. वाढत्या तापमानाचा परिणाम हृदय, यकृत आणि मूत्रपिंडांवर होऊन त्यांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. हवामानातील बदल, पाण्याची कमतरता, सावलीचा अभाव आणि वाढते काँक्रीटीकरण यामुळे शहरातील भटके प्राणी आणि पक्ष्यांची परिस्थिती अधिक बिकट होत असल्याचेही तज्ज्ञांनी नमूद केले आहे. नागरिकांनी घराबाहेर पाण्याची सोय करावी. तसेच त्रस्त प्राणी आढळल्यास तत्काळ रुग्णालयाशी संपर्क साधावा.

जास्तीत जास्त डिहायड्रेशन आणि हिट स्ट्रोकचे सर्वाधिक आहेत. यातूनच त्यांना इतर अडचणी वाढत आहेत. त्यातुन त्यांना रुग्णालयात दाखल करुन उपचार करण्याची गरज भासत आहे. घुबड, पोपट , कोकिळा, घार, बगळा, चिमणी हे पक्षी आढळले आहेत. त्यासोबत, वानर, माकडे, खार हे देखील उपचारांसाठी आले. सरपटणारे प्राणी वेगवेगळ्या प्रकराचे साप, कासव आणि सरडा हे प्राणी आढळून आले आहेत.

# नवी मुंबई महानगरपालिकेच्या १६६ कोविड योद्ध्यांची नोकरीसाठी धडपड

## कायमस्वरूपी सेवेसाठी मंत्री गणेश नाईकांना साकडे

**नवी मुंबई : बातमीदार**

संपूर्ण जग कोरोनाच्या संकटात असताना जीवाची पर्वा न करता नवी मुंबईकरांसाठी धावून आलेल्या कोविड कर्मचाऱ्यांवर (करारपध्दीवर) आता आपल्या हक्कासाठी लढण्याची वेळ आली आहे. २०२० पासून महापालिकेत कार्यरत असलेल्या या १६६ कर्मचाऱ्यांनी आपल्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत नवी मुंबईचे सर्वेसर्वा वनमंत्री गणेश नाईक यांची भेट घेऊन त्यांना साकडे घातले आहे. महापालिकेतील सत्ताधाऱ्यांनी इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सकारात्मक निर्णय घेतले असताना, आम्हालाच डावलले जात असल्याचा आरोप या कर्मचाऱ्यांनी केला आहे.

२०२० मध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव नियंत्रणात आणण्यासाठी महापालिकेने जाहिरात प्रसिद्ध करुन वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, एएनएम, औषध निर्माता आणि प्रयोगशाळा तंत्रज्ञ अशा विविध पदांवर कर्मचाऱ्यांची करारपध्दतीवर भरती केली होती. कोरोना काळ संपल्यानंतरही महापालिकेच्या आरोग्य विभागात कर्मचाऱ्यांचा तुटवडा असल्याने प्रशासनाने या कर्मचाऱ्यांना सहा-सहा महिन्यांकरिता (१८० दिवसांची) मुदतवाढ आदेश देऊन आजही सेवेत कायम ठेवले आहे, मात्र सध्या त्यांना मिळणाऱ्या वेतनात कपात करण्यात आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे.

महापालिकेच्या शिक्षण विभागातील शिक्षक, एनयूएचएम मधील १० वर्षे पूर्ण झालेले कर्मचारी आणि इतर २९ कर्मचाऱ्यांबाबत महापालिकेने आणि शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन त्यांना कायमस्वरुपी करण्यासाठी प्रस्ताव पाठवले आहेत, मात्र कोविड काळात विहित मार्गाने (जाहिरात, मुलाखत, गुणवत्ता यादी) नियुक्त झालेल्या या १६६ कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव अद्यापही शासनाकडे पाठवण्यात आला नसल्याचे या कर्मचाऱ्यांनी वनमंत्री गणेश नाईक यांच्या निदर्शनास आणुन दिले आहे. सदर कर्मचाऱ्यांनी या बाबतचे निवेदन महापौर सुजाता पाटील व आयुक्तांनाही पाठविले आहेत.

नियुक्ती आदेश आणि ओळखपत्राअभावी कामात येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर कराव्यात, आदी मागण्या या कर्मचाऱ्यांकडून करण्यात आल्या आहेत.

# कामोठ्यात कायदेविषयक जनजागृती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सुषमा पाटील महाविद्यालय व ज्युनिअर कॉलेज, कामोठे येथे आज तालुका विधी सेवा समिती, पनवेल तसेच पनवेल वकील संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने कायदेविषयक जनजागृती कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात पॅनल वकिलांमार्फत विद्यार्थ्यांना विविध महत्त्वपूर्ण कायद्यांविषयी मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये भारतीय संविधानाच्या भाग IV-A अंतर्गत मूलभूत कर्तव्ये, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क कायदा, २००९, बाल लैंगिक गुन्ह्यांपासून संरक्षण कायदा, २०१२ (पॉक्सो कायदा), नालसा (मुलांसाठी बाल-स्नेही कायदेशीर सेवा) योजना, २०२४ यांसह बालभिक्षा मागणे, बालमजुरी, बाल तस्करी व बालविवाह मुक्त भारत या विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमात ॲड. विकी दुसिंग, ॲड. नागेश हिरवे, ॲड. अमोल खिल्लारे तसेच PLV शैलेश कोंडसकर यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच वरिष्ठ लिपिक हेमंत आंबेतकर यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमास महाविद्यालयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पनवेलकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या कार्यक्रमास २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली.



# तुर्भे वाहतूक स्टेशन सर्कल परिसरात नगरसेविका शैला पाटील यांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

ठाणे बेलापूर मार्ग वरील तुर्भे वाहतूक पोलीस ठाणे सर्कल परिसरात प्रत्यक्ष स्थळी पाहणी करण्यात आली. यावेळी ठाणे बेलापुर मार्ग विभागाचे कार्यकारी अभियंता पंढरीनाथ चावडे यांच्या समवेत परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.



याभागात गतिरोधक नसल्याने वाहने सुसाट चालवली जय आहेत. त्यामुळे अपघाताचे प्रकार घडत आहेत. याविषयी नागरिकांकडून सातत्याने शैला पाटील यांच्याकडे तक्रारी करण्यात आल्या होत्या. या तक्रारींची दखल घेत स्थळ पाहणी केली. त्यानुसार या भागात रंबलर बसवले जाणत आहेत.

सदर ठिकाणी वाढत्या अपघातांची गंभीर दखल घेत, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता बिडवाई यांच्याशी दूरध्वनीवर चर्चा करण्यात आली.

सदर विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, संबंधित अधिकाऱ्यांनी कनिष्ठ अभियंता हिरे यांना तात्काळ आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत.

गेल्या काही काळात या मार्गावर अपघातांचे प्रमाण वाढले असून, वाहनांचा वेग जास्त असल्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण झाला आहे. तसेच वारंवार होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे स्थानिक नागरिक व वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे.

यामुळे सदर ठिकाणी तात्काळ गतीरोधक बसविण्याची कार्यवाही करण्यात येणार असून, यामुळे वाहनांचा वेग नियंत्रणात येऊन अपघातांना आळा बसेल असे भाजपाच्या स्थानिक नगरसेविका शैला पाटील यांनी सांगितले.

# गो-मातेला राष्ट्रमाता घोषित करण्याची मागणी

## उरणमध्ये गोप्रेमींचे तहसीलदारांना निवेदन

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

उरण येथील उरण गौ भक्त यांच्या वतीने आज उरणचे तहसीलदार रविंद्र सानप यांना 'गो-माता'ला 'राष्ट्र माता' घोषित करण्याबाबत अधिकृत निवेदन देण्यात करण्यात आले. भारतीय संस्कृतीत गाईचे असलेले धार्मिक, सांस्कृतिक आणि आर्थिक महत्त्व लक्षात घेता सदर निवेदन देण्यात आले. या उपक्रमाचा एक भाग म्हणून, देशभरातील ५०० हून अधिक तहसीलदारांना विविध ठिकाणी गौप्रेमी व गौभक्तांच्या वतीने अशाच प्रकारची निवेदने सादर करण्यात आली आहेत, ज्यातून या विषयाला राष्ट्रीय स्तरावर मिळत असलेला व्यापक पाठिंबा अधोरेखित होतो.



यावेळी प्रतिनिधी मंडळाने उरण पोलीस ठाण्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी देखील सविस्तर चर्चा केली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलाणी यांची भेट घेऊन त्यांना माहिती देण्यात आली.हा उपक्रम शांततेत, कायद्याचे पालन करून आणि शिस्तबद्ध पद्धतीने राबविण्यात येईल, याची माहिती प्रशासनाला देण्यात आले.सदर निवेदनात गाईला भारतीय परंपरेत "माता" म्हणून दिलेले स्थान, तिचे पोषणात्मक आणि कृषी अर्थव्यवस्थेतील योगदान यावर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच हा प्रस्ताव शासनाच्या उच्च स्तरावर पाठवून सकारात्मक निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली आहे.

# नवी मुंबईतील समस्यांबाबत महापौरांना निवेदन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई शहरातील विविध शैक्षणिक आणि सामाजिक समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), नवी मुंबई शाखेच्या वतीने महापौर सुजाता सुरज पाटील यांना निवेदन देण्यात आले.

या निवेदनाद्वारे शहराच्या विकासामध्ये आणि नागरिकांच्या सुरक्षिततेमध्ये मोलाची भर टाकणाऱ्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर तातडीने कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

कोपरखैरणे येथे ट्युशन क्लासेसची इमारत कोसळून झालेल्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर, शहरातील सर्व ट्युशन क्लासेसच्या इमारतींचे त्वरित ऑडिट करून धोकादायक इमारतींवर योग्य कार्यवाही करण्यात यावी.

तरुण पिढीला विळखा घालणाऱ्या अंमली पदार्थांच्या वाढत्या विक्रीवर



पोलिसांनी कठोर कारवाई करावी. वाढत्या अपघातांना आळा घालण्यासाठी वाहतूक व्यवस्था सक्षम करावी आणि पाम बीच रोडवरील स्पीड लिमिटचे नियम सक्तीने लागू करावेत. बांधकामांमुळे ढासळलेली हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी उपाययोजना कराव्यात. तसेच, शहराची ओळख असलेल्या फ्लेमिंगो पक्ष्यांच्या कमी होणाऱ्या संख्येवर लक्ष देऊन त्यांचे संवर्धन करावे.

शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात असलेल्या मद्य आणि सिगारेट विक्री केंद्रांवर कायद्यानुसार कारवाई करून ती बंद करण्यात यावीत. बाहेरगावाहून शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी महानगरपालिकेने सुसज्ज शासकीय वस्तीगृह उभारावे.

यावेळी अभाविप नवी मुंबई विधी कार्य संयोजिका रागिनि चौहान, वाशी नगर मंत्री प्रेम जाधव, नेरूळ नगर सहमंत्री शिवेंद्र शिरसाट, विश्वजीत पाटील उपस्थित होते.

# सेंट विल्फ्रेडच्या उपप्राचार्यांवर कारवाई; बजरंग दल विद्यार्थ्यांच्या पाठीशी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

शेडुंग परिसरातील नामवंत सेंट विल्फ्रेड कॉलेजमध्ये घडलेल्या एका गंभीर प्रकारामुळे शैक्षणिक क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. महाविद्यालयाच्या उपप्राचार्यांनी अनुत्तीर्ण विषय (AIKT) उत्तीर्ण करून देण्यासाठी विद्यार्थीनीकडे बेकायदेशीररीत्या पैशांची मागणी केल्याचा तसेच तिच्याशी अयोग्य वर्तन केल्याचा आरोप समोर आला असून तक्रारीनंतर पोलिसांनी कारवाई केली आहे.

या घटनेमुळे शिक्षण व्यवस्थेच्या गुणवत्तेवर आणि नैतिकतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. शिक्षण संस्थांमध्ये विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासोबतच सुरक्षित



आणि सन्मानजनक वातावरण देणे अत्यावश्यक असते, मात्र अशा प्रकारच्या घटनांमुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना,लाचेची मागणी निर्माण होत आहे. अशा घटनांना पायबंद बसावा म्हणून अखिल आर्यंवत संघ-आंतरराष्ट्रीय बजरंग दलाने पुढाकार घेतला असून आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे संस्थापक अध्यक्ष दिनेशदादा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण प्रांत अध्यक्ष(प्रसिध्दी प्रमुख)राकेश खराडे, रायगड जिल्हा मंत्री जनार्दन मालुसरे, खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी ,उरण विधानसभा संघटक सतीश पाटील,गोरक्षा प्रमुख मलेश गुडसे यांनी शेडुंग येथील कॉलेज व्यवस्थापनाचे सोनी यांच्याकडे लेखी निवेदन देऊन कडक कारवाईची मागणी केली आहे.

सदर महाविद्यालयाच्या गेटवर DO ॲड DON'T S असा सर्वांना समजेल असा फलक लावून सदर मुलीला पुढील शिक्षण मोफत द्यावे अशी मागणी केली आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांवर कोणतीही वाईट परिस्थिति आल्यास त्यांनी आंतरराष्ट्रीय बजरंग दल हेल्पलाईन नंबर वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ऐरोलीत भव्य हिंदू संमेलन उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली विभागातील सेक्टर ४, ५, १६ आणि १७ परिसरातील नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागातून ऐरोली येथे भव्य हिंदू संमेलन उत्साहात आणि धार्मिक वातावरणात पार पडले. या संमेलनाचे अध्यक्षस्थान महामंडलेश्वर ह.भ.प. विजय महाराज बाळसराफ यांनी भूषवले.

संमेलनात हिंदू संस्कृती, परंपरा आणि एकात्मतेचा प्रभावी संदेश देण्यात आला. समाजात बंधुभाव, संघटन आणि संस्कार यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.संमेलनातून हिंदू समाजाने एकत्र येत आपल्या संस्कृतीचे जतन, सामाजिक ऐक्य आणि राष्ट्रहितासाठी कार्य करण्याचा संकल्प व्यक्त केला. उपस्थितांनी कार्यक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा उपक्रमांची अपेक्षा व्यक्त केली.या प्रसंगी प्रमुख वक्ते सिन्हा उपस्थित होते.

या कार्यक्रमात लहान मुलांचे सांस्कृतिक सादरीकरण, लाठी-काठी प्रात्यक्षिक, शस्त्रपूजन तसेच मुलांच्या कला प्रदर्शनाचा समावेश करण्यात आला. कार्यक्रमाला भाजपचे नगरसेवक शिवाजी खोपडे तर शिवसेनेच्या नगरसेविका ऐश्वर्या सोनवणे व नगरसेविका हेमांगी सोनवणे, ॲड. संध्या सावंत, बबनराव पाटणकर, अनिल नामदेववार यांच्यासह अनेक मान्यवरांची विशेष उपस्थिती लाभली.

या संमेलनाचे आयोजन सचिव संकेत साळवी, उपाध्यक्ष सुभाष परब, ॲड. पूजा लाड, संजय साळुंखे तसेच संत सावता माळी मंडळ, ऐरोलीचे सचिव रोहित भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. सामाजिक कार्यकर्ते स्वप्निल कोळेकर यांच्या सहकार्याने कार्यक्रम यशस्वी करण्यात आला.

कार्यक्रमासाठी स्वप्निल डोके, कुंदन उबाळे, विपुल कुरकुरे, अनिकेत कुरकुरे, गणेश विधाते तसेच मावळा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, महिला पदाधिकारी आणि कार्यकारिणी सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# दिव्यांग केंद्रात लागली आग

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली येथील संजीवन दीप (मानसिक व शारीरिक दिव्यांग मुलांचे केंद्र) येथे रात्री २ वाजता आग लागल्याची घटना घडली. अग्निशमन दलाच्या ३ गाड्या तात्काळ घटनास्थळी दाखल होऊन आग आटोक्यात आणण्यात आली.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. सर्व दिव्यांग मुले सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आली, मात्र आत साठवलेले Zomato व Amazon पार्सल साहित्य तसेच सायकलचे पण नुकसान झाले आहे, असे सांगत आहे. यामुळे आर्थिक फटका बसला आहे.

आगीचा धूर सेक्टर ४ आजूबाजूच्या परिसरात पसरला होता. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिक घटनास्थळी पोहोचून पाहणी व विचारपूस केली.

# गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीकडून विद्यार्थ्यांना मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीच्या वतीने महात्मा इंटरनॅशनल स्कूल आणि श्री नारायण गुरु इंटरनॅशनल स्कूल याठिकाणी २७ व २८ एप्रिल २०२६ रोजी 'स्वसंरक्षण कार्यशाळा व तायक्वांदो प्रात्यक्षिक' या उपक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत १२०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेत मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षणाचा लाभ घेतला.

या कार्यशाळेत मास्टर तुषार सिनलकर (पाचवा दान ब्लॅक बेल्ट, आंतरराष्ट्रीय पंच, आंतरराष्ट्रीय पुरस्कारप्राप्त व भारतीय क्रीडा प्राधिकरण मान्यताप्राप्त प्रशिक्षक) यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात उपयोगी पडणाऱ्या स्वसंरक्षण तंत्रांचे मार्गदर्शन केले. त्यांनी



आत्मविश्वास, शिस्त आणि सजगतेचे महत्त्व पटवून दिले.

त्यांच्या मार्गदर्शनाखालील टीममधील राष्ट्रीय विजेते व खेळाडू प्रेम, ओमकार, समृद्धी, राज, आशीष, तनिष आणि क्षितिज यांनी प्रात्यक्षिक सादर करत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये स्वसंरक्षणाची जाणीव निर्माण करणे तसेच शारीरिक तंदुरुस्ती आणि मानसिक बळकटी वाढविणे हा होता. कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून शाळा प्रशासन व शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

या यशस्वी आयोजनासाठी श्री नारायण गुरु इंटरनॅशनल स्कूलच्या मुख्याध्यापिका देबोलीना रॉय, पिल्लई विद्यापीठाचे क्रीडा संचालक पद्मकिशन पद्मनाभन सर, महात्मा इंटरनॅशनल स्कूलचे मुख्याध्यापक जोमन मॅथ्यू, क्रीडा समन्वयक विकास लाडे तसेच इतर शारीरिक शिक्षण शिक्षक यांचे मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल गुरुकुल तायक्वांदो अकॅडमीने सर्वांचे आभार मानले.

# माणगावात राजकीय समीकरणांना नवी कलाटणी

## उद्योजक सिताराम उभारे, अंबर्ले सरपंच, उपसरपंचासह अनेक कार्यकर्ते भाजपत दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील राजकारणात महत्त्वाची घडामोड घडत असून लोणेरे विभागातील प्रभावी नेते शिवसेना उबाठा गटाचे नेते, प्रसिद्ध उद्योजक सिताराम उभारे यांनी आपल्या असंख्य समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. त्यांच्या या प्रवेशामुळे माणगाव तालुक्यातील सत्तासमीकरणा मध्ये मोठा बदल होण्याची शक्यता राजकीय वर्तुळात वर्तवली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून श्री. उभारे हे आपल्या कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याची चर्चा लोणेरे, गोरेगाव मध्येच नव्हे तर माणगाव तालुक्यात सुरू होती. अखेर ता. २३ एप्रिल रोजी गुरुवारी सायंकाळी उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे झालेल्या कार्यक्रमात त्यांनी अधिकृतरित्या



भाजपचे कमळ हाती घेतले. हा प्रवेश भाजपचे आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी सिताराम उभारे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख कार्यप्रणालीवर विश्वास व्यक्त करत तसेच प्रवीण दरेकर यांच्या नेतृत्वावर श्रद्धा ठेवून व मार्गदर्शनाखाली आपण भाजपमध्ये प्रवेश केल्याचे सांगितले. त्यांच्या या निर्णयाला अंबर्ले गावचे सरपंच अंकुश उभारे, उपसरपंच दीपेश खाडे, ग्रामपंचायत सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी ही यावेळी प्रवेश केला. या पक्षप्रवेशात परशुराम उभारे, पंढरी कदम, मंगेश कदम, रमेश उभारे, बौद्धवाडी अध्यक्ष सुनील शिंदे, तंटामुक्त समिती अध्यक्ष रामचंद्र उभारे, उद्योजक अरविंद उभारे तसेच मुगवली, मोर्बा परिसरातील अनेक कार्यकर्ते आणि मुंबईस्थित ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. कार्यक्रमाला महाड विधानसभा प्रमुख बिपिन महामुनकर, दक्षिण रायगड उपाध्यक्ष भालचंद्र (नाना) महाले, भाजपचे युवा नेते युवराज मुंडे तसेच ज्येष्ठ नेते सुनीलबापू सोनगिरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. सिताराम उभारे हे सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय असून लोणेरे, गोरेगाव आणि माणगाव परिसरात त्यांचा प्रभाव मानला जातो. त्यांच्या प्रवेशामुळे भाजपला स्थानिक पातळीवर मोठी बळकटी मिळणार असल्याचे मानले जात आहे. विशेष म्हणजे, या घडामोडीमुळे शिवसेना शिंदे गट व उबाठा गटाला मोठा धक्का बसल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. येत्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हा प्रवेश अत्यंत महत्त्वाचा मानला जात असून तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

> **भाजपच्या माध्यमातून लोणेरे, गोरेगाव व माणगाव तालुक्यातील गावागावात पक्ष संघटना अधिक बळकट करण्यावर अधिक भर देण्यात येईल तसेच दत्तात्रय देवस्थान ट्रस्ट चिंचवली गोरेगाव येथील सहा कोटी दहा लाख रुपये मंजूर काम सदर चालू असणारे काम रविंद्र चव्हाण साहेब यांच्या कडून मंजूर करून घेतले आहे आणि हे काम भाजपने मंजूर केले आहे. हे संपूर्ण कुणबी समाज आणि इतर सर्व समाज बांधव यांना या संदर्भात माहिती आहे. विकास कामांना गती दिली जाईल. अनेक तलाव व पर्यावरण मधुन नदी संवर्धन तसेच पर्यटन मधुन अनेक कामे प्रस्ताव शासनाकडे मंजुरी करीता प्रविणभाऊ दरेकर साहेब यांनी मुख्यमंत्री महोदय यांच्या बरोबर चर्चा करून मंजूर करण्यात येणार आहेत.**
>
> **–सिताराम उभारे, भाजप नेते, माणगाव रायगड**

# खोपोलीत मंत्री रामदास आठवलेंचे भीमसैनिकांना मार्गदर्शन

**खोपोली : प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा या मंत्रावर जीवन जगत प्रगती साध्य करण्याचे आवाहन सामाजिक न्याय विभागाचे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी खोपोलीत केले.

खोपोली शहरातील यशवंतनगर येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) च्या वतीने सार्वजनिक जयंती महोत्सव सोहळ्याला आठवले उपस्थित होते. भीम विचारांचा



जागर करत समता, ज्ञान आणि बंधुतेचा संदेश देणाऱ्या विविध कार्यक्रमाचे दोन दिवस आयोजन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आ) पक्षाचे पदाधिकारी, यशवंतनगर परिसरातील नागरिकांनी केले होते.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले, आमदार महेंद्र थोरवे,खोपोली नगराध्यक्ष कुलदिपक शेंडे, उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व भीमसैनिकांच्या उत्स्फूर्त सहभागाने संपन्न झाला. सोहळ्याची सांगता करमणुकीच्या कार्यक्रमाने करण्यात आली. सामाजिक ऐक्याचा संदेश देणारा हा भव्य सोहळ्याचे आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे विशेष अभिनंदन आठवले यांनी केले.

# स्व. संतोष पवार स्मृती सन्मान सोहळा

## प्रकाश सावंत, विजय मोकल, मोतीराम पादीर सन्मानित




**कर्जत : प्रतिनिधी**

सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या पत्रकारितेचा गौरव करण्यासाठी कर्जत प्रेस क्लबतर्फे दिला जाणारा मानाचा 'स्व. संतोष पवार स्मृती राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार सोहळा नेरळ येथे संपन्न झाला. यंदा राज्यस्तरीय पुरस्कार नवशक्ति चे संपादक प्रकाश सावंत यांना, स्व. सुनील दांडेकर स्मृती जिल्हास्तरीय पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार विजय मोकल (पेण) यांना, तर स्व. धर्मानंद गायकवाड स्मृती तालुकास्तरीय पुरस्कार युवा पत्रकार मोतीराम पादीर (कर्जत) यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

तालुक्यातील नेरळ येथील मंडलिक सभागृहात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उदघाट्न करण्यात आले. याप्रसंगी मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, रायगड प्रेसचे अध्यक्ष प्रशांत गोपाळे, जिल्हा परिषद सदस्या सुनीता मोरे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष दीपक श्रीखंडे, महिला तालुकाध्यक्ष ॲड. रंजना धुळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, माजी पंचायत समिती सदस्य नरेश मसणे, माजी नगराध्यक्ष अजय सावंत, विवेक चौधरी, उपगराध्यक्ष संतोष शेलार, नगरसेवक शिवाजी शिंदे, सुनील शिंदे, सीताराम कुंभार, रिझवाना शेख, मनीषा पवार आदी उपस्थित होते.

कर्जत प्रेस क्लबचे अध्यक्ष गणेश पवार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. माजी अध्यक्ष विद्यानंद ओव्हाळ यांनी प्रस्तावित करताना प्रेस क्लबच्या उपक्रमांची माहिती दिली. रिझवाना शेख, शिवाजी शिंदे, ॲड. रंजना धुळे यांनी स्व. संतोष पवार यांच्या कार्याची माहिती सांगितली. अजय सावंत यांनी, ' संतोष पवार यांनी सुरु केलेला माथेरान महोत्सव पुन्हा सुरु करावा. तरच पवार यांना खरी श्रद्धांजली ठरेल.' असे स्पष्ट करून हा महोत्सव सुधाकर घारे यांनी सुरु करण्यासाठी पुढाकार घ्यावा. अशी विनंती केली. प्रशांत गोपाळे, मिलिंद आष्टीवकर यांनी, संतोष पवार यांच्या आठवणींना उजाळा दिला. प्रकाश सावंत यांनी, ' हल्लीचे राजकारण हीन दर्जाचे होत चालले आहे. भोंदू बाबा, बुवाबाजीला महत्व दिले जाते. पत्रकारांनी काही विषय घेऊन सातत्याने पाठपुरावा केल्यास शासनाला, प्रशासनाला ते काम करावे लागते. पवार यांच्या बरोबर आम्ही मुंबई – गोवा चार पदरी रस्ता व्हावा यासाठी आंदोलन केल्याचे सांगितले.

सुधाकर घारे यांनी, 'पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यामुळे त्याला महत्व आहे. पवार यांनी माथेरानच्या विकासासाठी महत्वाची भूमिका बजावली होती. माझ्या निवडणुकीत पवार यांनी परिचय पत्रिका तयार केली. तेंव्हा मला खऱ्या अर्थाने मी काय कार्य करीत आहे.याची जाणीव झाल्याचे सांगितले

# श्रीवर्धनमध्ये विराट हिंदू संमेलन उत्साहात

**श्रीवर्धन:प्रतिनिधी, बातमीदार**

रायगड जिल्ह्याची सांस्कृतिक राजधानी आणि दक्षिण कोकणची काशी समजल्या जाणाऱ्या श्रीवर्धन शहरात काल 'सकल हिंदू समाजा'च्या वतीने आयोजित 'विराट हिंदू संमेलन' अभूतपूर्व उत्साहात संपन्न झाले. धर्मरक्षण, राष्ट्रभक्ती आणि हिंदू संघटन या त्रिसूत्रीचा जागर करण्यासाठी आयोजित या मेळाव्याने श्रीवर्धनच्या इतिहासात नव्या पर्वाची सुरुवात केली आहे.

सोमवारी सायंकाळी श्री गणेश मंदिरापासून या संमेलनाचे रणशिंग फुंकले गेले. पारंपारिक वेशभूषा, कपाळावर भगवा टिळा आणि हातात धर्मध्वज घेतलेल्या हजारो माता–भगिनी व तरुणांच्या उपस्थितीत निघालेली दिंडी हे या सोहळ्याचे प्रमुख आकर्षण ठरली.

श्री सोमजादेवी मंदिरापर्यंत काढण्यात आलेल्या या पदयात्रेत टाळ–मृदंगाच्या गजराने आणि 'जय श्रीराम'च्या घोषणांनी



अवघे आकाश व्यापून गेले होते. मार्गावर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करत नागरिकांनी या 'हिंदू शक्ती'चे जंगी स्वागत केले.

मंदिराच्या विस्तीर्ण प्रांगणात या दिंडीचे सभेत रूपांतर झाले. सभेच्या सुरुवातीलाच कोकणातील वीर परंपरेचे दर्शन घडवणारे साहसी मर्दानी खेळ सादर करण्यात आले. लाठी–काठी आणि तलवारबाजीच्या प्रात्यक्षिकांनी उपस्थितांच्या अंगावर शहारे आणले. सामाजिक जाणीव आणि हिंदू संस्कृतीचे महत्त्व सांगणाऱ्या पथनाट्यांनी प्रेक्षकांना अंतर्मुख केले.

अभयराजे जगताप यांचे धगधगते विचारः "संघटन हीच काळाची गरज"

या संमेलनाचे मुख्य वक्ते, प्रख्यात प्रबोधनकार मा. श्री. अभयराजे जगताप यांनी आपल्या ओजस्वी वाणीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले की, "हिंदू धर्म हा केवळ कर्मकांड नसून ती एक जीवनशैली आहे. आजच्या काळात विखुरलेला हिंदू समाज एकत्र येणे ही काळाची गरज आहे. आपल्या संस्कृतीचे, मंदिरांचे आणि मूल्यांचे रक्षण करण्यासाठी प्रत्येकाने सजग राहायला हवे."

त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रभक्तीचा धागा पकडत, तरुणांना व्यसनांपासून दूर राहून राष्ट्रकार्यासाठी सज्ज होण्याचे आवाहन केले. त्यांच्या प्रत्येक वाक्याला उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात आणि घोषणांच्या जल्लोषात दाद दिली.

महोत्सवाचा कळसः भव्य महाआरती आणि संकल्प

कार्यक्रमाची सांगता श्री सोमजादेवीच्या दिव्य महाआरतीने झाली. हजारो दिव्यांच्या प्रकाशात आणि मंत्रघोषात झालेली ही आरती उपस्थितांच्या मनाला शांती आणि शक्ती देऊन गेली.

या विराट संमेलनासाठी केवळ श्रीवर्धनच नव्हे, तर दिवेआगर, हरिहरेश्वर, बोर्ली आणि आसपासच्या अनेक गावांमधून हिंदू बांधवांनी महासागर लोटला होता.

आयोजकांनी केलेल्या शिस्तबद्ध नियोजनामुळे आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्यामुळे हा ऐतिहासिक सोहळा कोणत्याही अडथळ्याविना पार पडला.

## मलनिःसारण चेंबरमध्ये अडकला घोड्याचा पाय

**माथेरान :** माथेरान येथे सुरू असलेल्या मलनिःसारण प्रकल्पाच्या कामातील निष्काळजीपणाचा फटका एका अश्वमालकाला बसला असून चेंबरच्या झाकणात घोड्याचा पाय अडकल्याची घटना घडली.सुदैवाने या अपघातात घोडा व त्यावरील प्रवासी थोडक्यात बचावले; मात्र घोड्याच्या पायाला दुखापत झाली आहे.

माथेरान शहरात सध्या मलनिः सारण प्रकल्पांतर्गत पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू आहे.या कामासाठी रस्त्यांवर ठिकठिकाणी खड़े खोदन चेंबर उभारण्यात आले आहेत.मात्र या चेंबरवर बसविण्यात आलेली झाकणे निकृष्ट दर्जाची असल्यचे यावरुन लक्षात येत आहे



# मुरूड-राजपुरी समुद्रात शिडाच्या बोटींच्या शर्यतीचा थरार; छोट्या गटात लक्ष्मी तर मोठ्या गटात अलनुरानी बोट प्रथम

**मुरुड : प्रतिनिधी**

ऐतिहासिक जंजिरा किल्लात वर्षभर लाखो पर्यटकाना सुरक्षित जंजिरा किल्ल्यात आपल्या शिडाच्या बोटीतून ने आण करीत असतात .त्यांच्या ह्या कामाचा गुणगौरव करण्यासाठी व पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी जंजिरा किल्ल्यासमोर शिडाच्या बोटींच्या स्पर्धा आमदार महेंद्र दळवी यांच्या मार्गदर्माशमाखली दरवर्षी या स्पर्धा भरवल्या जातात. अलनुरानी बोट ग्रुप राजपुरी यांनी शिडाच्या बोटींच्या स्पर्धा आयोजित केल्या होत्या.या शर्यतीचा थरारा मध्ये छोट्या गटात लक्ष्मी बोट नी तर मोठ्या गटात अलनुरानी बोटींनी प्रथम क्रमांक पटकावला या शर्यतीचा



थरारा आज पर्यटकांना पाहायला मिळाला.

यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य विघ्नेश माळी, मनोज कमाने,शानवाज डॉक्टर , इस्माईल आदमने, मंगेश कुणबी ,नाजभाई कादरी, तरबेज कारभारी, ग्रामसेवक सचिन पाटील, मोहतसिम पांगारकर आदिंसह मान्यवर मुरुड राजपुरी येथील १० शिडाच्या बोट चालक मालक यांनी स्पर्धत सहभाग नोंदविला होता.या मधुन छोट्या गट व मोठा गट तयार करण्यात आल होते.दुपारी ३ वाजता शिडाच्या बोटीच्या स्पर्धला राजपुरी जुनी जेट्टी वर फटाके फोडुन सुरुवात करण्यात आली. राजपुरी जेट्टी ते दिघी ५ किलोमीटर पर्यंत शर्यती चे अंतर ठेवण्यात आले होते.

छोट्या गटात, इब्रानी बोट, सुबानी बोट,,रहमानी बोट, लक्ष्मी बोट, मोहम्मदी बोट, सुलतानी बोट यांनी सहभाग नोंदविला होता.या मधुन लक्ष्मी बोटीने प्रथम क्रमांक पटकावला तर व्दितीय क्रमांक सुलतानी बोटीने, तृतीय क्रमांक इब्राहीम बोटीने यांनी पटकावला

मोठ्या गटात अलनुरानी ,लासानी,अकबरी,रुब्बानी या बोटीने सहभाग घेतला.यामधुन अलनुरानी बोट यांनी प्रथम क्रमांक पटकावला तर व्दितीय क्रमांक लासानी बोटीने , तृतीय क्रमांक रब्बानी बोट ने पटकावला

# लायन्स क्लब अलिबागचा स्तुत्य उपक्रम; ई–कचरा संकलन आणि प्रक्रिया

**मुरुड : प्रतिनिधी**

लायन्स क्लब अलिबाग मुरुड या संस्थेने पर्यावरण आठवड्या अंतर्गत अलिबाग नगरपालिकेच्या सहकार्याने ई कचरा संकलनाचे काम हाती घेतले होते. ई कचरा म्हणजेच इलेक्ट्रॉनिक कचरा ही आज पर्यावरणासाठी फार मोठी समस्या असून भारत ई कचरा निर्मितीत तिसऱ्या क्रमांकावर आहे. त्यामुळे याबाबत जागृती निर्माण करणे, त्याचे संकलन करणे आणि योग्य विल्हेवाट लावणे फार गरजेचे आहे.

१९ एप्रिल ते २६ एप्रिल दरम्यान लायन्स क्लबच्या माध्यमातून अध्यक्ष प्रदीप नाईक यांनी शहरातील नागरिक आणि क्लब सदस्यांना सदर कचरा



जमा करण्याचे आवाहन केले. याला शहरात उत्तम प्रतिसाद मिळाला असून, जमा झालेल्या कचऱ्यापैकी ११५० ई कचरा पुढील प्रक्रियेकरिता रवाना करण्यात आला. लायन अनिल आगाशे यांनी या उपक्रमाची जबाबदारी उचलली. त्यांना महेंद्र पाटील, संतोष पाटील, महेश कवळे, संजय माळी,विकास घरत, अभिजित आमले,नयन कवळे, यांनी सहकार्य केले. लायन्स क्लब अलिबागच्या सर्वच सदस्यांनी या ई कचरा निर्मूलन उपक्रमात आपला सहभाग नोंदवला.

अलिबाग नगरपालिका नगराध्यक्ष अक्षया नाईक, उपाध्यक्ष ॲड मानसी म्हात्रे, गटनेते प्रशांत नाईक,सर्व नगरसेवक आणि मुख्याधिकारी साळुंखे साहेबांचे सुद्धा या कामी सहकार्य मिळाले. लायन्स क्लब अध्यक्ष प्रदीप नाईक यांनी ही मोहीम पुढील काही दिवस चालूच राहील असे सांगितले. ई कचरा हे पर्यावरणासाठी फार मोठे आव्हान असल्याने लायन्स क्लब आणि नगरपालिकेच्या माध्यमातून किमान तीन टन ई कचरा गोळा करून त्यावर पुढील योग्य प्रक्रिया करण्याचे काम पूर्ण करण्यात येईल असे सांगितले.

# आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी क्रिकेट चषकाचे रिहा इलेव्हन उमरोली कर्जत मानकरी

**चौक : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी क्रिकेट चषकावर रिहा इलेव्हन उमरोली कर्जत संघाने आपले नाव कोरले, एक लाख एकावन्न हजार रुपयांच्या रोख पारितोषिक बरोबर भव्य चषक जिंकून क्रिकेट प्रेमींना बहारदार खेळ दाखविला.

भारतीय जनता पक्षाचे उपाध्यक्ष, उद्योगपती आणि दानशूर सुधीर ठोंबरे व माजी जिल्हा परिषद सदस्य मोतीराम ठोंबरे यांनी भारतीय जनता पक्ष चौक परिसर व चौक टेनिस क्रिकेट असोसिएशन संलग्न यांच्या सहकार्याने चौक जवळील हातनोली गावातील भव्य नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. क्रिकेट बघण्यासाठी रायगड जिल्ह्यासह नवी मुंबई,मुंबई, ठाणे आणि पुणे परिसरातील क्रिकेट प्रेमी उपस्थित होते, मानस ठोंबरे आणि मयुर ठोंबरे यांनी त्यांच्या सहकारी यांनी अतिशय सुंदर नियोजन केले होते. बक्षिसांची खैरात, चौका, षटकार, विकेट आणि प्रेक्षक यांच्यातून झेल घेणारे यांच्यासाठी रोख रकमेसह कुलर,एलइडी यांची लयलूट करण्यात आली.चार दिवस संपन्न झालेल्या क्रिकेट स्पर्धेत अंतिम विजेता रिहा इलेव्हन उमरोली कर्जत, एक लाख एकावन्न हजार आणि चषक,



द्वितीय क्रमांक दत्ताभाई मांडे इलेव्हन तुपगाव रोख पंचाहत्तर हजार व चषक,तृतीय क्रमांक विघ्नेश इलेव्हन वरोसे रोख चाळीस हजार व चषक, तर चतुर्थ क्रमांक श्री वरदविनायक आसरेवाडी रोख चाळीस हजार व चषक मालिकावीर सुबोध भोसले वरोसे याने बाईक गाडी पटकावली,उत्कृष्ट फलंदाज अनिकेत गायकवाड तुपगाव, उत्कृष्ट गोलंदाज अल्पेश गायकवाड तुपगाव, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक अक्षय आंब्रे आसरेवाडी लकी ड्रॉ बाईक विजेता मंदार उतेकर बोरगाव. यांनी बक्षिसे जिंकली.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून या क्रिकेट योजनेचे कौतुक केले, तर आमदार महेश बालदी यांनी चारधाम येथून भ्रमणध्वनी करून शुभेच्छा दिल्या. रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेंद्र थोरवे, माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष आस्वाद पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड अध्यक्ष सुधाकर घारे, भारतीय जनता पक्षाचे नेते प्रीतम म्हात्रे, उत्तर रायगड अध्यक्ष अविनाश कोळी, खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, नगरसेवक संतोष पाटील, सोमनाथ ठोंबरे, प्रशांत पाटील, कर्जत शहर राष्ट्रवादी युवक अध्यक्ष हर्षल मोरे, चौक सरपंच रितू ठोंबरे,जेष्ठ नेते विनोद भोईर, माजी सरपंच राजू मोरे, गणेश कदम,सचिन मते, दत्ता मांडे, सुनील गायकवाड, सागर ओसवाल, दत्ता मांडे, नितीन तवळे, अजिंक्य देशमुख, यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे नेते, कार्यकर्ते, क्रिकेट प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# मुंबई संघाचे टेन्शन वाढले!

## अनुभवी मिचेल सँटनर स्पर्धेतून बाहेर

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएल २०२६ चा हंगाम मुंबई इंडियन्स साठी आतापर्यंत अत्यंत निराशाजनक ठरला आहे. हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली संघाला सात सामन्यांपैकी फक्त दोन विजय मिळाले असून पाच पराभवांचा सामना करावा लागला आहे. खराब फॉर्मसोबतच दुखापतींच्या समस्यांनीही संघाची डोकेदुखी वाढवली आहे.

संघासाठी मोठा धक्का म्हणजे सलामीचा आणि अनुभवी फलंदाज रोहित शर्मा मागील तीन सामन्यांपासून दुखापतीमुळे बाहेर आहे. त्याचबरोबर न्यूझीलंडचा अष्टपैलू फिरकी गोलंदाज मिचेल सँटनरही खांद्याच्या दुखापतीमुळे संपूर्ण हंगामातून बाहेर पडला आहे. मुंबईने त्याला २ कोटी रुपयांना करारबद्ध केले होते, मात्र त्याने या हंगामात फक्त चार सामने खेळून पाच विकेट्स आणि काही धावा केल्या.



फ्रँचायझीने अधिकृतपणे घोषणा केली आहे की सँटनरच्या जागी दक्षिण आफ्रिकेचा अनुभवी फिरकी गोलंदाज केशव महाराज याला संघात सामील करण्यात आले आहे. त्याला ७५ लाख रुपयांच्या करारावर घेतले गेले असून, त्याच्याकडून मध्य फळीतील विकेट घेण्याची जबाबदारी अपेक्षित आहे.

दरम्यान, मुंबई इंडियन्सचा संपूर्ण हंगाम पाहता फलंदाजी आणि गोलंदाजी दोन्ही विभागात सातत्याचा अभाव दिसून येत आहे. हार्दिक पांड्याच्या कर्णधारपदाखाली संघाचा समतोल बिघडल्याची चर्चा सुरू आहे. संघाच्या प्रमुख फलंदाजांनी अपेक्षित कामगिरी न केल्यामुळे सामने हातातून निसटत गेले आहेत.

# विघ्नहर्ता मुरूड समाज मंडळातर्फे जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धा



**माणगाव : बातमीदार**

टि.एम.सी.कॉलेज मैदान माणगांव येथे विघ्नहर्ता बुरुड समाज मंडळ रजि. आयोजित जिल्हास्तरीय अंडर आर्म टेनिस क्रिकेट स्पर्धा - २०२६ रविवार दिनांक २६ एप्रिल रोजी उत्साहात संपन्न झाली.

स्पर्धेचे उद्‌घाटन नानासाहेब सावंत , चेअरमन,जे. बि. सावंत एज्युकेशन सोसायटी आणि उपाध्यक्ष - मुंबई क्रिकेट क्लब असोसिएशन्स, तसेच बुरुड समाज संघटनेचे कोकण विभागीय अध्यक्ष मनोहर मोरे, रायगड जिल्हाध्यक्ष जितेंद्र महाळे, माणगांव तालुकाध्यक्ष रत्नाकर महाळे, माणगांव नगरपंचायत नगरसेविका सुविधा खैरे आणि समाज सेवक संतोष खैरे, उद्योजक चेतन गायकवाड, सौरभ खैरे, करंबेळी गावचे सरपंच अल्पेश मोरे, समाजसेवक संजय मोरे, विविध श्रेत्रात काम करणारे व क्रिकेट प्रेमी डॉ.अजय मोरे आणि सर्व तालुका अध्यक्ष यांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

स्पर्धेत अलिबाग, उरण, पेण, माणगांव, महाड, पाली, तळेगांव आणि करंबेळी येथील संघ सहभागी झाले होते. यातुन उरण संघाने प्रथम क्रमांक २५००० रुपये रोख व भव्य चषक, अलिबाग संघाने व्दितीय क्रमांक, २०,००० रुपये रोख व भव्य चषक तर तळेगांव (माणगांव) संघाने तृतीय क्रमांक १५,००० रुपये रोख व भव्य चषक पारितोषिक पटकावला. क्रिकेटच्या या महासंग्राम - २०२६ स्पर्धेत उरण संघातील युवा व अष्टपैलू खेळाडु गितेश नागे (फलंदाजी) व बाल खेळाडु कु अर्णव जाधव (गोलंदाजी) यांनी सर्वांचे लक्षवेधीत विशेष प्राविण्य मिळवित कामगिरी केली.

रायगड जिल्ह्यातील बुरुड समाजातील सर्व युवा तरुण व माजी सिनीअर खेळाडु एकत्र यावे, त्यांचा बौद्‌धिक व शारीरिक विकास व्हावा तसेच युवा खेळाडुंना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध व्हावे या प्रामाणिक हेतुने सदर स्पर्धेचे प्रथमच आयोजन करण्यात आले अशी माही संघटनेचे अध्यक्ष श्री शरद मोरे त्यांचे सहकारी व मॅनेजमेंट टिम जयेश मोरे, मुकुंद मोरे, प्रविण मोरे, योगेश खैरे, मनोज मोरे आणि सहकारी यांनी दिली.

सदर स्पर्धा यशस्वी व्हावी म्हणून मंत्री भरतशेठ गोगावले , संदिपभाई नागे, हर्षदा काळे - सोंडकर (नगरसेविका) आणि डॉ.अजय मोरे तसेच वैभव मोरे, अभिजीत जाधव, नरसिंह मोरे (समालोचक व स्कोरर व्यवस्थापक) आणि माणगांव तालुका क्रिकेट असोसिएशन्सचे कोच रोहित काळे यांनी सहकार्य केले तसेच संघटनेतील सर्व पदाधिकारी यांनी मेहनत घेतली.



# रिंकू सिंहने मोडला धोनीचा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

सध्या देशात आयपीएल २०२६ ची धुमधाम सुरु आहे. आयपीएल म्हणजे अनेक क्रिकेटप्रेमींसाठी पर्वणीच असते. जुने रेकॉर्ड मोडून नवे रेकॉर्ड बनवणे यामुळे अनेक क्रिकेटपटू प्रकाशझोतात येत असतात. असाच पुन्हा एकदा रिंकू सिंह प्रकाशझोतात आला आहे. आयपीएल २०२६ मध्ये लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या रिंकु सिंहची खेळी महत्त्वाची ठरली. त्याच्या खेळीमुळे कोलकात्याच्या विजय तर झालाच पण या सामन्यात रिंकू सिंहने इतिहास रचला आहे. महत्त्वाचे म्हणजे हा इतिहास रचून त्याने महेंद्रसिंह धोनीचा १५ वर्षे जुना विक्रम मोडीत काढला.

आयपीएल २०११ स्पर्धेत महेंद्रसिंह धोनीने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरूद्धच्या सामन्यात सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला आला. यावेळी त्याने नाबाद ७० धावांची खेळी केली होती. हा सहाव्या क्रमांकावर वैयक्तिक सर्वोच्च धावा होत्या. पण आता रिंकुच्या नावावर हा विक्रम नोंदवला गेला आहे.

# महाडमध्ये खासदार चषक २०२६ कबड्डी स्पर्धा

**महाड : प्रतिनिधी**

महाडमध्ये राज्य पातळीवरील कबड्डी स्पर्धा आयोजित व्हावी यासाठी प्रयत्न करणार असून, तालुक्यात स्वतंत्र क्रीडा संकुल उभारण्यासाठीही पाठपुरावा करू," असे प्रतिपादन माजी आमदार अनिकेत तटकरे यांनी केले. 'खासदार चषक २०२६' या तालुका तथा जिल्हास्तरीय खुल्या कबड्डी स्पर्धेदरम्यान चांदे क्रीडांगण येथे भेट दिली असता ते बोलत होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत आणि जय हनुमान तांबड भुवन, महाड आयोजित ही स्पर्धा दिनांक २५ आणि २६ एप्रिल रोजी प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात पार पडली. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशन तसेच महाड कबड्डी असोसिएशन यांच्या मान्यतेनुसार झालेल्या या स्पर्धेत जिल्ह्यातील विविध संघांनी सहभाग घेत चुरशीच्या लढती रंगवल्या.

स्पर्धेदरम्यान अनिकेत तटकरे यांनी क्रीडांगणाला भेट देत सामने पाहिले व खेळाडूंना प्रोत्साहन दिले. त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस नाना जगताप, माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, प्रवक्ते



धनंजय देशमुख, नगरसेविका अक्षया हेलेकर, दिक्षा शिंदे बांधकाम सभापती सुमित पवार, नगरसेवक संकेत वारंगे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेच्या देखण्या आयोजनाचे कौतुक करताना अनिकेत यांनी रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या सामन्यांनाही महिलांसह मोठ्या संख्येने प्रेक्षक उपस्थित राहिल्याचे नमूद करताना महिलांमध्ये असलेली ही सुरक्षिततेची भावना आयोजकांच्या यशस्वीतेचे प्रमाण असल्याचे सांगितले. स्पर्धेत पेण विरुद्ध स्थानिक महाड संघ यांच्यात जवळपास अडीच तास रंगलेल्या सामन्याचे देखील त्यांनी विशेष कौतुक केले.

उत्तर रायगडातील अलिबाग, पनवेल परिसरातील खेळाडूंनी पूर्वीपासूनच कबड्डीमध्ये नावलौकिक मिळवला असला तरी अलीकडे दक्षिण रायगडातील संघही त्यांना तोडीस तोड लढत देताना दिसत असून ही बाब खेळाच्या प्रगतीसाठी सकारात्मक असल्याचे त्यांनी नमूद केले.

उत्कृष्ट स्पर्धेसाठी त्यांनी कबड्डी असोसिएशन तसेच पंचांचे आभार मानले. खेळाडूंनी खेळभावना जपावी, असे आवाहन करत कबड्डी फेडरेशनशी चर्चा करून पुढील वर्षी महाडमध्ये राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यासाठी निश्चित प्रयत्न करू, असे आश्वासन देत,रोहा येथे तालुका क्रीडा संकुल असून क्रिकेट स्टेडियमची उभारणी सुद्धा सुरू असल्याचा दाखला देत, त्याच धर्तीवर महाड तालुक्यात अद्याप क्रीडा संकुल उपलब्ध नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. महाडमध्येही क्रीडा संकुल उभारण्यासाठी निश्चितपणे प्रयत्न करू, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी अध्यक्ष निलेश शिंदे, नगरसेवक संकेत वारंगे, स्पर्धाप्रमुख उमेश जगताप, संचित चिनके, वेदांत मोरे यांच्यासह मंडळाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### जिल्हास्तरीय निकाल

***प्रथम :*** *ओंकार वेश्वी*
***द्वितीय :*** *मरीदेवी ढेरंड*
***तृतीय :*** *जय बजरंग रोहा*
***चतुर्थ :*** *नवतरुण करावी.*
*विशेष पुरस्कार :*
***सर्वोत्कृष्ट खेळाडू :*** *नीरज मिसाळ*
***उत्कृष्ट पकड :*** *प्रेम कांबळे*
***उत्कृष्ट चढाई :*** *सुयोग गायकर.*

*तालुकास्तरीय चौरंगी स्पर्धेत शिवसाई सरेकर आळी महाड संघाने प्रथम, काळभैरव जितेने द्वितीय, कालिकामाता वडघरने तृतीय, तर गावदेवी कुसगाव संघाने चतुर्थ क्रमांक पटकावला.*

### तालुकास्तरीय विशेष पुरस्कार

***सर्वोत्कृष्ट खेळाडू :*** *साहिल भुवड (सरेकर आळी)*
***उत्कृष्ट चढाई :*** *साहिल ठाकूर (सरेकर आळी)*
***उत्कृष्ट पकड :*** *सुरज ननावरे (काळभैरव).*

# घणसोली येथे नवी मुंबई रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

घणसोली येथील सेंट्रल पार्क स्केटिंग ट्रॅक येथे २६ एप्रिल रोजी नवी मुंबई रोलर स्केटिंग चॅम्पियनशिप २०२६ मोठ्या उत्साहात पार पडली. जयश्री फाउंडेशन व




द टीम एक्स्ट्रीम स्केटिंग अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत नवी मुंबईतील ३५० हून अधिक खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला, ज्यामुळे संपूर्ण परिसर स्केटिंगच्या थरारात रंगून गेला. स्पर्धकांनी आपल्या वेग, कौशल्य आणि आत्मविश्वासाचे उत्कृष्ट प्रदर्शन सादर केले.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून क्रीडा सभापती Girish Kanha Mhatre उपस्थित होते. त्यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यांनी आपल्या भाषणात स्केटिंगसारख्या खेळांची वाढती लोकप्रियता लक्षात घेता, महानगरपालिकेतर्फे आवश्यक ते सहकार्य आणि सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले.

या स्पर्धेस EazyDiner, Apollo Hospitals, Age Concept, Suryoday Small Finance Bank आणि Shell Hotels यांचे मोलाचे सहकार्य लाभले. आयोजकांपैकी Vaibhav Jadhav यांनी सांगितले की, "यंदा प्रथमच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून भविष्यात स्केटिंगसह इतर खेळांनाही प्रोत्साहन देण्याचा आमचा मानस आहे."

तर Karan Sardar यांनी स्पर्धकांचे आभार मानत सांगितले की, "स्पर्धकांनी दाखवलेला विश्वास आमच्यासाठी प्रेरणादायी आहे. आगामी काळात अशा स्पर्धा अधिक भव्य आणि उत्साहात आयोजित करण्याचा आमचा संकल्प आहे." या यशस्वी आयोजनामुळे नवी मुंबईत स्केटिंग खेळाची वाढती लोकप्रियता अधोरेखित झाली असून भविष्यात या खेळाला अधिक चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com